दैनिक
www.sahyandrinews.com
# सह्याद्रीचा राखणदार
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • अंक २० • RNI : MAHMAR/2023/87818 • रविवार दि.१० नोव्हेंबर २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# महायुतीच्या सरकारमध्ये देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असतील:केंद्रीय मंत्री अमित शहा यांचे स्पष्ट संकेत

## राजकीय वर्तुळात मुख्यमंत्री पदाबाबत चांगलीच चर्चा सुरू



सांगली (वृत्तसंस्था)-केंद्रीय मंत्री अमित शहा यांनी महाराष्ट्रातील प्रचार सभेत आगामी काळात महायुतीच्या सरकारमध्ये देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असतील असे संकेत दिले. सांगली जिल्ह्यातील शिराळा येथे भाषण करताना अमित शहा यांनी देवेंद्र फडणवीस यांचे नाव घेत तेच मुख्यमंत्री असतील असे संकेत दिले आहेत. महाराष्ट्रामध्ये देवेंद्र फडणवीस यांनाच आणायचे, अशी महाराष्ट्रातील जनतेची इच्छा असल्याचे अमित शहा यांनी म्हटले आहे. त्यामुळे आता राजकीय वर्तुळात मुख्यमंत्री पदाबाबत चांगलीच चर्चा सुरू झाली आहे. विधानसभा निवडणुकीच्या नंतर महायुतीचा मुख्यमंत्री पदाचा चेहरा कोण? याबाबत चांगलीच खलबते सुरू आहेत. राज्यात २० नोव्हेंबर रोजी मतदान असले आणि २३ रोजी निकाल लागणार असला तरी मुख्यमंत्री पदाचा चेहरा कोण असेल? याबाबत सुरुवातीपासूनच चर्चा रंगली आहे. त्यात महायुतीमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार या तीनही नेत्यांच्या नावावर चर्चा सुरू आहे. तर महाविकास आघाडीमध्ये उद्धव ठाकरे, नाना पटोले, जयंत पाटील आणि सुप्रिया सुळे यांच्या नावाची चर्चा आहे. मात्र या वादात आता अमित शहा यांनी थेट देवेंद्र फडणवीस यांच्या नावाचे संकेत दिल्याने याबाबत राजकीय चर्चा रंगली आहे.

### एकत्र बसून निर्णय घेणार-अजित पवार

**मुख्यमंत्री पदाबाबत आम्ही शहा यांच्या वक्तव्यानंतर**



**उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील प्रतिक्रिया दिली आहे. आम्ही महायुती म्हणून याबाबत एकत्र बसून निर्णय घेणार असल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे. महायुतीचाच मुख्यमंत्री होईल, असा दावा देखील अजित पवार यांनी केला आहे. मात्र, अमित शहा यांनी जे संकेत दिले आहेत याबाबत विचारले असता, तो त्यांचा अधिकार असल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे. राज्यात तीन पक्ष एकत्र निवडणुकीला सामोरे जात आहेत. त्यामुळे युतीमध्ये दोन पावले मागे यावे लागतात तर कोणाला दोन पावले पुढे जावे लागत असल्याचे अजित पवार यांनी म्हटले आहे.**

### मोदी-शहांनी अवघा महाराष्ट्र लुटला

# मुलगी शिकली,प्रगती झाली आणि पंधराशे देऊन घरी बसवली,हा विकास आहे?-उद्धव ठाकरे

**नांदेड (वृत्तसंस्था)**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी शनिवारी पुन्हा एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यावर तिखट हल्ला चढवला. नरेंद्र मोदी व अमित शहा यांनी अवघा महाराष्ट्र लुटला. त्यानंतर आता ते महाराष्ट्रात मते मागण्यासाठी जागोजागी फिरत आहेत, असे ते म्हणालेत. मुलगी शिकली, प्रगती झाली आणि पंधराशे देऊन घरी बसवली, हा विकास आहे का? असा उपरोधिक टोलाही त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारवर निशाणा साधताना हाणला.उद्धव ठाकरे यांची शनिवारी नांदेड जिल्ह्यातील लोहा - कंधार विधानसभा मतदारसंघात सभा झाली. या सभेत त्यांनी भाजप महायुतीवर विशेषतः पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यावर तिखट टीका केली. ते म्हणाले, नरेंद्र मोदी व अमित शहांना आता महाराष्ट्राची आठवण झाली आहे. आतापर्यंत त्यांना महाराष्ट्र केवळ लुटण्यासाठी आहे असे वाटत होते. पण आता महाराष्ट्रातील लोकांना मतदानाचा अधिकार आहे हे त्यांच्या लक्षात आले आहे. त्यानुसार आता ते इथे येऊन मतांचा जोगवा मागत आहेत.

या लोकांनी महाराष्ट्राचे सर्व उद्योग लुटून गुजरातला नेता आणि आता निर्लज्जपणे महाराष्ट्राची मते मागता? तुम्हाला काय वाटते? तुम्ही काही केले तरी चालले आणि महाराष्ट्र केविलवाणेपणाने मत देईल? ही लढाई केवळ उद्धव ठाकरे व शिवसेनेची नाही. आपल्याला सत्ता पाहिजे. पण हे सर्व केवळ महाविकास आघाडीसाठी नाही तर येथील सर्वसामान्य जनतेसाठी आपल्याला सत्ता हवी आहे.उद्धव ठाकरे म्हणाले, भाजपने आता बटेंगे तो कटेंगे असा नारा दिला आहे. कोण कापणारे आहेत? जे काही कापणारे आहेत ते तुमच्यासोबत सत्तेत बसलेले आहेत. त्यांनी माझ्या एका कार्यकर्त्याचे केवळ फेसबुक पोस्ट टाकली म्हणून बोटे कापली.



ज्यांनी माझ्या कार्यकर्त्याची बोटे कापली, त्यांना आम्ही आता राजकारणात कापणार आहोत, असे उद्धव ठाकरे यावेळी माजी खासदार तथा अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार प्रताप पाटील चिखलीकर यांना इशारा देत म्हणाले. चिखलीकर यांच्यावर ठाकरे गटाच्या एका कार्यकर्त्याची बोटे छाटल्याचा आरोप आहे.मोदी येथे आले तर त्यांना हा माझा बोटे कापलेला कार्यकर्ता दाखवा. त्यांना विचारा कोण आहे हा? काय त्याचा गुन्हा? विरोधात पोस्ट टाकली म्हणून त्याचे बोटे छाटता? त्याने तर पोस्ट टाकली, मी तर तुमच्याविरोधात उघडपणे बोलत आहे, असे ते म्हणाले. उद्धव ठाकरे यांनी यावेळी बोटे छाटलेल्या पीडित कार्यकर्त्याला आपल्याजवळ बोलावले. तसेच त्याला त्याच्यावर बेतलेल्या प्रसंगाचा बदला मी स्वतः घेणार, असा धीरवजा शब्द त्याला दिला. यावेळी उपस्थितांनी मोठी घोषणाबाजी केली.उद्धव ठाकरे पुढे म्हणाले, आतापर्यंत भाजपवर मोदी व शहांची पोलादी पकड होती. पण आता त्यांची सर्वत्र छी - थू होत आहे. त्यांचे अनेक नेते आता या दोघांचे काहीही चालत नाही म्हणून भाजप सोडून जात आहेत. सर्वजण आमच्या हातातील मशालीच्या प्रकाशात येत आहेत. आमच्याकडे मशालीचा प्रकाश, तर भाजपमध्ये केवळ काळा अंधार पसरला आहे.महायुतीचे लोक आता शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्याची वल्गना करत आहेत. पण मी स्वतः शेतकऱ्यांना कर्जमुक्त केले होते. त्यांनी सरकार पाडले नसते तर मी दुसऱ्यांदा त्यांना कर्जमाफी दिली असती. तेवढी धमक आहे माझ्यात. पण आता त्यांनी रस्ते प्रकल्पाच्या माध्यमातून ठेकेदारांचे खिसे भरण्याचे काम सुरू केले आहे. विकासाच्या नावाखाली देशात ढोंग सुरू आहे. केवळ उड्डाणपूल बांधल्यामुळे विकास होत नाही. पण त्या उड्डाणखाली आमच्या बेरोजगारांवर भीक मागण्याची वेळ येत असेल तर उड्डाणपूल काय कामाचा? अरे त्या तरुणांच्या हातांना काम द्या, त्यानंतर आपोआपच विकास होईल.मुलगी शिकली प्रगती झाली आणि पंधराशे देऊन घरी बसवली, हा विकास आहे का? आम्ही असा कोणताही भेदभाव करणार नाही. आम्ही मुलींसारखेच प्रत्येक मुलांना मोफत शिक्षण देईल.मी मुख्यमंत्री असताना महाराष्ट्रातील एकही उद्योग का गुजरातला गेला नाही. भाजपच नव्हे तर मोदी - शहांचीही महाराष्ट्राकडे वाकडे पाहण्याची हिंमत नव्हती. कोरोना काळातही आम्ही हिंमतीने महाराष्ट्राचे उद्योग वाढवले. पण हे डोळ्यात सलत असल्यामुळे त्यांनी आमचे सरकार पाडले. त्यानंतर येथील सर्व उद्योग गुजरातला पळवले. आता ते आमच्यावर विकासाला खिळ घालण्याचा आरोप केला आहे. खरे तर त्यांनीच आमच्या तरुणांच्या रोजगाराला खिळ घालण्याचे काम केले आहे, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

# सांगोल्यात रविवारी उध्दवसाहेब ठाकरे यांची तोफ धडाडणार

**सांगोला । प्रतिनिधी**

शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे प्रचाराच्या मैदानात उतरले आहेत. कोल्हापूर येथे महालक्ष्मीचे दर्शन घेऊन त्यांनी विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराचा प्रारंभ केला आहे. रविवार दि.१० नोव्हेंबर रोजी दु. ३.०० वाजता सांगोला शहरातील न्यू इंग्लिश स्कूलच्या मैदानावर महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार दिपकआबा साळुंखे पाटील यांच्यासाठी शिवसेना पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे प्रचार सभा घेऊन महाविकास आघाडीतील कार्यकर्त्यांना आणि शिवसैनिकांना मार्गदर्शन करणार आहेत. सांगोला विधानसभा मतदारसंघातून शिवसेना उद्धव ठाकरे गटाकडून माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांना उमेदवारी दिली आहे. रविवार दि.१० नोव्हेंबर रोजी दुपारी ३.०० वाजता सांगोला शहरातील न्यू इंग्लिश स्कूलच्या मैदानावर महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार दिपकआबा साळुंखे पाटील यांच्यासाठी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे प्रचार सभा घेणार आहेत. या पार्श्वभूमीवर माजी मुख्यमंत्री उद्धवसाहेब ठाकरे यांच्या दौऱ्याकडे आणि भाषणाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. त्यांच्या सभेची जय्यत तयारी सुरू असून सभेस येणाऱ्या गर्दीला कोणत्याही प्रकारे त्रास होणार नाही, अशा पद्धतीने नियोजन करण्यात येत आहे. तरी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व महाविकास आघाडीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख संभाजी शिंदे, काँग्रेसचे जेष्ठ नेते पी.सी. झपके, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष डॉ. धनंजय पवार व महाविकास आघाडी सांगोला तालुका यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# मूल येथे शिक्षकाची झाडाला फाशी घेऊन आत्महत्या

**मूल । प्रतिनिधी**



मूल शहरातील कर्मवीर मैदानात झाडाला फाशी घेऊन एका शिक्षकाने आत्महत्या केल्याची घटना आज सायंकाळी सात वाजताच्या सुमारास उघडकीस आली आहे. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मृत व्यक्तीचे नाव योगीराज कुळसंगे (वय ४५) असून, ते मूळचे मूल येथील रहिवासी आहेत. योगीराज कुळसंगे हे राजोली येथील नवभारत विद्यालयात शिक्षक म्हणून कार्यरत होते. त्यांच्या आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. मृतदेह मूल उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आला असून, मूल पोलीस पुढील तपास करीत आहेत.घटनेची माहिती कळताच मूल परिसरात शोककळा पसरली आहे.

### बारामतीत भाजपच्या कोणत्याही नेत्यांनी येऊ नये

# राज्यात अनेक ठिकाणी खूप काम, मी एकटा तिथे पुरेसा - अजित पवार

**मुंबई (वृत्तसंस्था)**

राज्यातील विधानसभा निवडणुकीचे अनुषंगाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून महाराष्ट्रात शुक्रवार पासून सभा सुरू झाल्या आहे. राज्यात विविध जिल्ह्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जाहीर सभा होणार आहे. मात्र, बारामती मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी याची सभा नको, असे अजित पवार यांनी मत व्यक्त केले होते. याबाबत खुलासा देताना राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, एका पत्रकाराने मला विचारले की, बारामतीत पवारांची सभा आहे का? तर मी म्हटल की, देशातील राष्ट्रीय नेते जेव्हा राज्यात येतात, तेव्हा ते जिल्ह्यात सभा घेतात. पुण्यात देखील त्यांची सभा असून पुण्यात बारामती येतोच ना, त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची तालुका स्तरावर नाही, तर जिल्ह्यात सभा होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. बारामतीत भाजपच्या कोणत्याही नेत्यांनी येऊ नये, कारण राज्यात अनेक ठिकाणी खूप काम असून मी एकटा तिथे पुरेसा आहे, असेही अजित पवार म्हणाले.

पुणे शहरातील वडगाव शेरी मतदार संघात महायुतीचे उमेदवार सुनील टिंगरे यांच्या प्रचारार्थ अजित पवार यांची जाहीर सभा शुक्रवारी आयोजित करण्यात आली. यावेळी अजित पवार यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, २०१४ साली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची बारामतीत सभा झाली होती, त्यावेळेस ती गोष्ट वेगळी होती. तेव्हा तिथे अजित पवार नावाचा कोण तरी व्यक्ती उभा होता आणि तेव्हा त्यांना अजित पवारला पराभूत करायचे होते, म्हणून त्यांनी बारामतीत सभा घेतली होती. आता त्यांना पराभूत करायचे नाही, तर मला निवडून आणायचे आहे. म्हणून त्यांनी सभा नाही घेतली. एका पुस्तकात जेष्ठ नेते छगन भुजबळ यांच्या संदर्भात धक्कादायक दावा करण्यात आला आहे. परंतु भुजबळ यांनी हे आरोप फेटाळून लावले आहे. यावर अजित पवार म्हणाले की, छगन भुजबळ यांनी याबाबत पुरेसा खुलासा केला आणि ते या बाबत न्यायालयात देखील जाणार आहे असे त्यांनी सांगितल आहे.अलीकडे निवडणुकीचे दिवस जसजसे जवळ येत आहे, तसे विरोधकांकडून महत्त्वाचे प्रश्न जाणीवपूर्वक बाजूला करून नवीन नरेटीव्ह सेट केला जात आहे. हा निवडणुकीचा मुद्दा नाही. राज्य पुढील पाच वर्षांसाठी कोणाच्या हातात द्यायचे, हा मतदारांच्या समोर महत्वाचा मुद्दा आहे, असेही अजित पवार म्हणाले.



# शिक्षणाशिवाय व्यक्ती विकास अशक्यप्राय

भारतात स्वातंत्र्यानंतर भारताचे पहिले शिक्षणमंत्री असलेले मौलाना अबुल कलाम आझाद यांची जयंती म्हणून दरवर्षी ११ नोव्हेंबर रोजी 'राष्ट्रीय शिक्षण दिन' साजरा केला जातो. ११ नोव्हेंबर २००८ पासून हा दिवस राष्ट्रीय शिक्षण दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय तत्कालीन केंद्रीय मनुष्यबळ मंत्रालयाने घेतला होता. तेव्हापासून दरवर्षी हा दिवस 'राष्ट्रीय शिक्षण दिन' म्हणून साजरा केला जातो. मौलाना अबुल कलाम आझाद यांनी शिक्षणमंत्री असताना त्यांच्या कार्यकाळात शिक्षण क्षेत्रात केलेल्या कार्याचा गौरव करण्यासाठी हा दिवस पाळला जातो. १८ नोव्हेंबर १८८८ रोजी जन्मलेले अबुल कलाम गुलाम मुहियुद्दीन अहमद बिन खैरोद्दीन अल-हुसैनी आझाद हे भारतीय स्वातंत्र्य कार्यकर्ते, लेखक आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे ज्येष्ठ नेते होते. मौलाना आझाद यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीतही काम केले व त्यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान बहुमोल आहे.

एक अग्रणी विचारवंत आणि विचारवंत म्हणून स्वातंत्र्यलढ्यातील त्यांची भूमिका प्रेरणादायी आहे. त्यांना शिक्षण क्षेत्राची आवड होती आणि त्यांनी सामाजिक बंधुत्व वाढवण्याचे काम केले. आझाद हे त्या काळातील सर्वात प्रभावशाली नेत्यांपैकी एक होते आणि त्यांचा समाजवाद आणि धर्मनिरपेक्षतेवर गाढ विश्वास होता. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ते भारत सरकारचे पहिले शिक्षणमंत्री झाले. राष्ट्रीय शिक्षण दिनाचा पहिला सोहळा विज्ञान भवन, नवी दिल्ली येथे तत्कालीन राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांच्या हस्ते झाला. या दिवशी विद्यार्थी आणि शिक्षक साक्षरतेचे महत्त्व आणि शिक्षणाच्या विविध पैलूंबद्दल त्यांचे विचार मांडतात. विद्यार्थी आणि शिक्षक साक्षरतेचे महत्त्व आणि शिक्षणाच्या सर्व पैलूंशी देशाची बांधिलकी सांगण्यासाठी एकत्र येतात. तसेच विविध शाळांमध्ये अनेक माहितीपूर्ण आणि आनंददायक चर्चासत्रे, निबंध परिसंवाद, भाषण, पोस्टर मेकिंग स्पर्धा आणि रॅली आयोजित करून साजरा केला जातो. अबुल कलाम आझाद यांनी भारताच्या शिक्षण व्यवस्थेत केलेल्या सर्व मूलभूत योगदानांना राष्ट्रीय शिक्षण दिन श्रद्धांजली अर्पण करतो.

१९२० मध्ये यूपीमधील अलीगढ येथे जामिया मिलिया इस्लामिया स्थापन करण्यासाठी फाउंडेशन कमिटीचे सदस्य म्हणून त्यांची निवड झाली. १९३४ मध्ये त्यांनी विद्यापीठाचा परिसर अलीगढहून नवी दिल्ली येथे हलवण्यातही मदत केली. आता कॅम्पसच्या मुख्य गेटला त्यांचे नाव देण्यात आले आहे. पहिले भारतीय शिक्षणमंत्री म्हणून, आझाद यांचे स्वातंत्र्योत्तर भारतातील मुख्य लक्ष ग्रामीण गरीब आणि मुलींना शिक्षण देणे हे होते. १६ जानेवारी १९४८ रोजी अखिल भारतीय शिक्षणावरील परिषदेला संबोधित करताना ते म्हणाले, आपण क्षणभरही विसरता कामा नये, किमान मूलभूत शिक्षण मिळणे हा प्रत्येक व्यक्तीचा जन्मसिद्ध हक्क आहे, ज्याशिवाय तो एक नागरिक म्हणून आपले कर्तव्य पूर्ण करू शकत नाही. आपल्या कार्यकाळात त्यांनी देशातील काही उत्तम शैक्षणिक संस्थांची स्थापना केली. त्यांनी दिल्ली विद्यापीठाच्या शिक्षण विभागाची स्थापना १९५१ मध्ये पहिली भारतीय तंत्रज्ञान संस्था आणि १९५३ मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाची स्थापना केली. त्यांच्या कार्यकाळात अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद आणि माध्यमिक शिक्षण आयोगाची स्थापना करण्यात आली. त्यांचा वारसा लक्षात ठेवण्यासाठी अल्पसंख्याक व्यवहार मंत्रालयाने १९८९ मध्ये मौलाना आझाद एज्युकेशन फाउंडेशनची स्थापना केली.

मनुष्यबळ विकास मंत्रालय दरवर्षी राष्ट्रीय शिक्षण दिनासाठी वेगळी थीम निश्चित केली जाते. देशाच्या शैक्षणिक क्षेत्राची उद्दिष्टे आणि त्या क्षेत्रातील प्रगती लक्षात घेऊन ही थीम निश्चित करण्यात आली आहे. थीमनुसार दिवसभराचे कार्यक्रम आखले जातात. यावर्षी सुध्दा सोमवार, ११ नोव्हेंबर रोजी शिक्षण दिन साजरा केला जाणार आहे. या वर्षीची थीम 'इंब्रेसिंग इनोव्हेशन' आहे २०२२ ची थीम चेंजिंग कोर्स, ट्रान्सफॉर्मिंग एज्युकेशन होती. ही थीम शिक्षण व्यवस्थेत सुधारणा करण्याची आणि ती सध्याच्या काळाशी जुळवून घेण्याची गरज दर्शवते.

आझाद यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी मोठे योगदान दिले होते. राष्ट्रीय शिक्षक दिन साजरा करण्याचा सर्वात मोठा उद्देश म्हणजे लोकांना शिक्षणाचा अधिकार आणि शिक्षणाचे महत्त्व याची जाणीव करून देणे. दरवर्षी ११ नोव्हेंबर रोजी सर्व शाळा आणि महाविद्यालयांमध्ये अनेक प्रकारचे कार्यक्रम आयोजित केले जातात. मौलाना अबुल कलाम आझाद यांनी १५ ऑगस्ट १९४७ ते २ फेब्रुवारी १९५८ पर्यंत देशाचे शिक्षणमंत्री म्हणून काम केले आणि २२ फेब्रुवारी १९५८ रोजी दिल्लीत त्यांचे निधन झाले. यासाठी त्यांना १९९२ मध्ये सर्वोच्च भारतीय नागरी सन्मान असलेल्या 'भारतरत्न' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. राष्ट्रीय शिक्षण दिन साजरा करणे ही मौलाना अबुल कलाम आझाद यांना श्रद्धांजली आहे. आज सर्वांना मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या जयंती दिनी राष्ट्रीय शिक्षण दिनाच्या हार्दिक शुभेच्छा

**-प्रविण बागडे,नागपूर**

# शिरूर टाकळीतील बँक सेवा बंद;नागरिकांची धावपळ वाढली

**सत्यम भोसले । शिरूर टाकळी**

शिरूर टाकळीतील नागरिकांना दिवाळीच्या सणासारख्या महत्त्वाच्या काळात बँकिंग सेवांचा मोठा अडचणींचा सामना करावा लागतो आहे. सणवार, लग्नकार्य आणि इतर सुट्ट्यांमध्ये नागरिकांना पैशाची आवश्यकता असते, परंतु गावांमध्ये एकच बँक उपलब्ध असल्याने नागरिकांना बँकिंग कामांसाठी मनःस्ताप सहन करावा लागतो आहे. काहींना बँकेत पैसे भरण्यासाठी तर काहींना बाहेरून पैसे पाठवण्यासाठी ताणतणाव येत आहे.




गेल्या पंधरवड्यात बँक ऑफ महाराष्ट्र शाखेचे कामकाज बंद आहे. तांत्रिक अडचणींमुळे खातेदारांना मलठण येथील बँकेत जाऊन आपले काम करणे भाग पडत आहे. या तांत्रिक अडचणीमुळे नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी आहे. कधी कधी अधिकारांची मुजोरी, कर्मचारी यांचा अभाव आणि प्रशासनाचा आडमुठेपणा यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो आहे.

या अडचणींमुळे आता नागरिक दुसरी राष्ट्रीयकृत बँक सुरू करण्याची चर्चा करत आहेत. बँकेचे प्रशासन आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लवकरात लवकर सेवांचा सुरुवात करावी आणि या समस्येबद्दल खुलासा करावा, अशी मागणी स्थानिक सरपंच अरुण घोडे आणि उपसरपंचांनी केली आहे.

वाढती समस्यांना लक्षात घेता, महिलांच्या घधउ प्रक्रियाही या कारणाने पूर्ण होऊ शकत नाही. अनेक वेळा बँकेच्या कामासाठी नागरिक लवकर येतात, मात्र सेवांचा अभाव आणि तांत्रिक अडचणींमुळे ते निराश होतात. यावर योग्य उपाययोजना घेण्याची गरज आहे, जेणेकरून नागरिकांची धावपळ थांबवता येईल.

या परिस्थितीमुळे शिरूर टाकळीतील बँक सेवांबद्दल नागरिकांमध्ये नाराजी आहे आणि यावर तातडीने लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

# पक्ष सोडले तरी शरद पवार आणि ॲड.सुधीर कोठारी यांचा स्नेह कायम

**हिंगणघाट । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांचे ॲड. सुधीर कोठारी यांच्याशी असलेले स्नेहपूर्ण संबंध कायम राहिले आहेत. शुक्रवारी, ८ नोव्हेंबर २०२४ रोजी शरद पवार हिंगणघाट येथे आले आणि त्यांनी ॲड. कोठारी यांच्या निवासस्थानी भेट दिली. या भेटी दरम्यान, पवार आणि कोठारी यांच्यात अर्धा तास बंद दाराआड चर्चा झाली. यावेळी माजी गृहमंत्री अनिल देशमुख, डॉ. निर्मेश कोठारी आणि आफताब खान यांच्यासह पवार गटाचे उमेदवार अतुल वांदिले उपस्थित होते.



पवार यांनी ॲड. कोठारी यांना त्यांच्या भूमिकेवर फेरविचार करण्याची विनंती केली. ॲड. कोठारी यांनी पक्षात मागील दोन वर्षांत घडलेल्या घटनांवर आपले मत व्यक्त केले. मात्र, या चर्चेचा नेमका काय निष्कर्ष लागला हे स्पष्ट झाले नाही.राहुल तिमांडे यांचा गट राकाँतून बंडाळा करणार्या उमेदवारांमध्ये समाविष्ट आहे, तरीही त्यांचा या चर्चेत सहभाग नव्हता. पवार यांच्या प्रयत्नांना प्रत्यक्षात किती यश येईल, हे काही काळानंतरच स्पष्ट होईल. याचदरम्यान, माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी आशा व्यक्त केली की, ॲड. सुधीर कोठारी आणि राजू तिमांडे लवकरच त्यांच्या पूर्वभूमिकेकडे परत येतील.


शरद पवार यांनी हिंगणघाटमधील जाहीर सभेत ही माहिती दिली आणि कोठारी यांच्या घरी जाऊन त्यांची भेट घेतल्याचे सांगितले.

# न.प.जवळील पाण्याच्या टाकीवरून इसमाचीआत्महत्या शिर्डी शहरात खळबळ

**शिर्डी । प्रतिनिधी**

शिर्डी येथील नगरपरिषद जवळील पाण्याच्या टाकीवरून उडी मारून एका इसमाने आत्महत्या केल्याची घटना संध्याकाळी साडेसहा वाजेच्या सुमारास घडली.

शिर्डीच्या नगर मनमाड रोडवरील नगरपरिषद कार्यालयाच्या बाजूस असलेल्या उंच पाण्याच्या टाकीवर चढून इसमाने उडी मारली, ज्यामुळे संपूर्ण शहरात खळबळ उडाली आहे. या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, शिर्डी पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहेत.बातमी लिहिण्यापर्यंत आत्महत्या करणाऱ्या इसमाची ओळख पटलेली नसून, शिर्डी पोलीस अधिक तपास करत आहेत.




# वर्धा जिल्ह्यात 'लाडक्या बहिणींचा' कौल ठरेल निर्णायक, महिला मतदारांचे मतदान महत्त्वपूर्ण

**वर्धा । प्रतिनिधी**

आगामी विधानसभा निवडणुकीत वर्धा जिल्ह्यातील महिला मतदारांचा कौल निर्णायक ठरणार आहे. लोकसभा निवडणुकीत महायुतीला जनतेचा अपेक्षित पाठिंबा न मिळाल्यामुळे, आगामी विधानसभा निवडणुकीत महिलांना आकर्षित करण्यासाठी महायुती सरकारने 'लाडकी बहिण' योजना आणि इतर विविध उपक्रम जाहीर केले आहेत. महिला मतदारांना आकर्षित करण्यासाठी मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना आणि मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना यासारख्या योजनांची घोषणा करण्यात आली आहे. त्यानुसार, महिलांच्या बँक खात्यात अग्रिम एक हजार पाचशे रुपयांची रक्कम जमा केली आहे. सुमारे ५,५८,७८१ महिला मतदारांवर लक्ष केंद्रित करत महायुती आगामी निवडणुकीत मतदानाची दिशा आपल्याला मिळवून देण्याच्या तयारीत आहे.वर्धा जिल्ह्यात एकूण ११,२८,३९२ मतदार असून त्यापैकी पाच लाखांहून अधिक महिला मतदार आहेत. महिलांचे मतदान महत्त्वपूर्ण ठरण्याची शक्यता आहे, परंतु महायुतीने वर्धा जिल्ह्यातील चार विधानसभा मतदारसंघांपैकी एकही महिलेला उमेदवारी दिली नाही, ज्यामुळे महिलांमध्ये नाराजी दिसून येत आहे. याउलट, महाविकास आघाडीने एका मतदारसंघात महिला उमेदवार उभा केला आहे, ज्यामुळे महायुतीविरोधी वातावरण निर्माण होण्याची शक्यता आहे. महायुतीने वर्धा जिल्ह्यातील महिला मतदारांना आकर्षित करण्यासाठी अनेक योजना जाहीर केल्या असल्या तरी, त्यांचा प्रभाव निवडणुकीच्या निकालावर काय पडेल, हे आगामी मतमोजणीच्या दिवशीच स्पष्ट होईल.

**वर्धा जिल्ह्याचे मतदारसंघ संख्येचे तपशील:**

एकूण मतदार : ११,२८,३९२
पुरुष मतदार : ५,६९,५९,८९८
महिला मतदार : ५,५८,७८१
इतर मतदार : १३

**निष्कर्ष:**

वर्धा जिल्ह्यातील महिला मतदार आगामी विधानसभा निवडणुकीत महत्त्वाचा रोल बजावणार आहेत. महायुतीने जाहीर केलेल्या योजनांचा प्रभाव महिला मतदारांच्या निर्णयावर किती पडतो, यावरच निवडणुकीचा निकाल अवलंबून असेल.

# निवडणूक प्रक्रियेसाठी जिल्हा प्रशासन सज्ज-जिल्हाधिकारी विनय गौडा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

येत्या २० नोव्हेंबर रोजी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक पार पडणार आहे. जिल्ह्यात खुल्या, मुक्त, नि:स्पक्ष वातावरणात अतिशय पारदर्शक पध्दतीने निवडणूक प्रक्रिया राबविण्यासाठी जिल्हा प्रशासन कटिबध्द असून यासाठी संपूर्ण यंत्रणा सज्ज आहे, असा विश्वास जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी व्यक्त केला. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुभाष चौधरी, जिल्हा माहिती अधिकारी राजेश येसनकर आदी उपस्थित होते.






लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये मतदानाची टक्केवारी ३ ने वाढली होती, असे सांगून जिल्हा निवडणूक अधिकारी श्री. गौडा म्हणाले, आगामी विधानसभा निवडणुकीमध्ये ही टक्केवारी आणखी वाढण्यासाठी विविध जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येत आहे. यात सायकल रॅली, रन फॉर व्होट, पोस्टर्स, रिल्स, निबंध, प्रश्नमंजुषा अशा विविध स्पर्धासुध्दा आयोजित करण्यात आल्या आहेत. जिल्ह्यातील दिव्यांग मतदार तसेच ज्येष्ठ मतदारांच्या मदतीसाठी प्रत्येक मतदान केंद्रावर स्वयंसेवक नेमण्यात येणार आहे. तसेच प्रत्येक मतदान केंद्रावर किमान मुलभूत सुविधा पुरविण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत.

जिल्ह्यात पुरेशा प्रमाणात ईव्हीएम : जिल्ह्यातील चंद्रपूर, बल्लारपूर आणि वरोरा विधानसभा मतदारसंघात १६ पेक्षा जास्त उमेदवार असल्याने प्रत्येक मतदान केंद्रावर दोन ईव्हीएमचा उपयोग होणार आहे. जिल्ह्यात अतिरिक्त ईव्हीएम असून कुठेही कमतरता नाही. जिल्ह्यातील सहाही विधानसभा मतदारसंघातील एकूण २०७७ मतदान केंद्राकरीता ३८०८ बॅलेट युनीट, २४९० कंट्रोल युनीट आणि २६७८ व्हीव्हीपॅट उपलब्ध आहे.

अतिशय पारदर्शक पध्दतीने ईव्हीएमची तपासणी : जिल्ह्यात आलेल्या ईव्हीएम कडक सुरक्षा बंदोबस्तात स्ट्राँग रुममध्ये ठेवल्या जातात. २४ बाय ७ येथे सुरक्षेचे कवच असून संपूर्ण परिसरात सीसीटीव्ही लावण्यात आले आहेत. राजकीय पक्षांच्या प्रतिनिधीसमोरच स्ट्राँग रुम उघडली जाते. त्यातही स्ट्राँग रुमसाठी डबल लॉक सिस्टीम असल्यामुळे कोणताही हस्तक्षेप होण्याचा प्रश्नच येत नाही. ईव्हीएमच्या तपासणीवेळी संबंधित कंपनीचे अभियंते बाहेरून येतात. तसेच राजकीय पक्षांच्या प्रतिनिधीसमोरच पारदर्शक पध्दतीने तपासणी केली जाते.

आतापर्यंत जिल्ह्यात २ कोटी ९० लक्षाची जप्ती : आदर्श आचारसंहितेची अतिशय काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात येत असून जिल्ह्यात आतापर्यंत रोकड, दारू, ड्रग्ज व इतर बाबी मिळून एकूण २ कोटी ९० लक्ष रुपये / वस्तुंची जप्ती करण्यात आली आहे. यात बल्लारपूर विधानसभा मतदारसंघात १६ लक्ष ३० हजार, ब्रम्हपुरी विधानसभा मतदारसंघात ५४ लक्ष ३९ हजार, चंद्रपूर मध्ये ४३ लक्ष, चिमूर १९ लक्ष ८८ हजार, राजुरा २४ लक्ष ६७ हजार आणि वरोरा विधानसभा मतदारसंघात १ कोटी ३२ लक्षाची जप्ती करण्यात आली आहे.

असे आहेत जिल्ह्यातील एकूण मतदार : चंद्रपूर जिल्ह्यामध्ये सहा विधानसभा मतदारसंघ असून यात ७०- राजुरा, ७१ -चंद्रपूर, ७२ -बल्लारपूर, ७३ -ब्रह्मपुरी, ७४ -चिमूर आणि ७५ वरोरा या मतदारसंघाचा समावेश आहे. जिल्ह्यात एकूण १८ लक्ष ५० हजार १०२ मतदार असून यात पुरुष मतदार ९ लक्ष ३९ हजार ११५, स्त्री मतदार ९ लक्ष १० हजार ९३९, इतर ४८ मतदारांचा समावेश आहे. राजूरा विधानसभा मतदारसंघात (पुरुष मतदार - १६७८९५, स्त्री मतदार - १५७३८१, इतर २, एकूण - ३२५२७८), चंद्रपूर विधानसभा मतदारसंघात (पुरुष मतदार - १८८७२४, स्त्री मतदार - १८५१६८, इतर ३५, एकूण - ३७३९२७), बल्लारपूर विधानसभा मतदारसंघात (पुरुष मतदार - १५८६२८, स्त्री मतदार - १५३७२०, इतर ७, एकूण - ३१२३५५), ब्रम्हपुरी विधानसभा मतदारसंघात (पुरुष मतदार - १३७७५२, स्त्री मतदार - १३७९१४ एकूण - २७५६६६), चिमूर विधानसभा मतदारसंघात (पुरुष मतदार - १४११५३, स्त्री मतदार - १३९६७४, एकूण - २८०८२७), आणि वरोरा विधानसभा मतदारसंघात (पुरुष मतदार - १४४९६३, स्त्री मतदार - १३७०८२, इतर ४, एकूण - २८२०४९).

# जनसेवेतून सामान्यांशी ऋणानुबंध' जपणार नेतृत्व विजय वडेट्टीवार



**सहकुटुंब भेटीने । नागरिक भारावले**

जनमतचा आशिर्वाद घेऊन निवडून येताच मतदारांना वाऱ्यावर सोडून मुंबई गाठणाऱ्या व सत्तेच्या मदमस्तीत तोऱ्यात मिरविणाऱ्या नेत्यांची संख्या राजकारणात काही कमी नाही. मात्र ज्यांनी आपल्याला जनसेविकरीता प्रतिनिधित्व देऊन मोठी जबाबदारी सोपविली. त्यांच्या अपेक्षांवर खरे उतरून सामान्यांच्या कुटुंबातला सदस्य समजून लोकहित जोपासणारे विजय वडेट्टीवार यांच्या सारखे सामान्यांशी ऋणानुबंध जपणारे नेतृत्व फारच कमी आहे. याचा प्रत्यय ब्रह्मपुरी शहरात नुकतेच निघालेल्या संवाद पदयात्रेतून आला.

गेल्या दशकापासून ब्रह्मपुरी विधानसभा क्षेत्राचे लोकप्रतिनिधित्व राज्याचे विरोधी पक्षनेते तथा ब्रह्मपुरी विधानसभा क्षेत्र आमदार विजय वडेट्टीवार हे करीत आहे. क्षेत्राचा सर्वांगीण विकास यासह मानव सेवा हाच खरा धर्म हे मानून जनतेसाठी समर्पित भावना जपणारे ,जनतेच्या प्रत्येक सुखदुःखात धावून जाणारे भाऊ अशी त्यांची ख्याती आहे. त्यामुळे ब्रह्मपुरी विधानसभा क्षेत्रातील विजय वडेट्टीवार या कर्तव्य तत्पर नेतृत्वाचे नाव प्रत्येक घरातील महिला भगिणी व आबाल वृद्धांपर्यंत पोहचले आहे.

सध्या सर्वत्र विधानसभा निवडणुकीची धामधूम सुरु आहे. अशातच निवडणूक प्रचार शिगेला पोहोचला असतांना ब्रह्मपुरी विधानसभा क्षेत्राकरिता महाविकास आघाडी तथा घटक पक्षाकडून उभे असलेले काँग्रेसचे अधिकृत उमेदवार विजय वडेट्टीवार यांनी ब्रह्मपुरी शहरातील नागरिकांशी संवाद थेट भेट घेण्यासाठी शहरातून पदयात्रा संवाद रॅली काढली. या दरम्यान त्यांनी पत्नी किरण वडेट्टीवार, मोठी कन्या रोशनी वडेट्टीवार, शिवानी वडेट्टीवार असे सहकुटुंब छोट्या उपहार गृह, पानटपरी तसेच मोठ्या व्यवसायिकांच्या व्यवसाय प्रतिष्ठानाला भेट दिली. सर्वसामान्य कुटुंबात जन्म घेऊन हा वडिलांचे छत्र हरपल्यानंतर स्वबळावर कुटुंबाची जबाबदारी तसेच सामान्य जनतेचे प्रश्न घेऊन विविध आंदोलने करून आज राज्याच्या विरोधी पक्षनेते पदी विराजमान झालेल्या विजय वडेट्टीवार यांच्या पाय जमिनीवर ठेवून कार्य करण्याच्या पद्धतीला बघून काहींनी हातात हात देऊन, तर काहींनी गळाभेट व वयोवृद्धांनी मायेचा हात फिरवून आशिर्वाद दिला. जनभावनेचा अनमोल ठेवा जपणाऱ्या विजय वडेट्टीवार रुपी असामान्य नेतृत्वाबद्दल जनसामान्यात असलेली महत्वकांक्षी प्रेम भावना, आदर, व सन्मान बघून उपस्थित नागरिक भारावले.

## राहुरीत शिवाजीराव कर्डिले यांच्या प्रचारार्थ पंकजा मुंडे यांच्या सभेला तुफान प्रतिसाद

**राहुरी । प्रतिनिधी**



आगामी विधानसभा निवडणुकीत भाजप महायुतीचे सरकार येणार असल्याचा विश्वास भाजप नेत्या व आमदार पंकजा मुंडे यांनी व्यक्त केला आहे. राहुरी विधानसभा मतदारसंघातील भाजपचे उमेदवार व माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले यांच्या प्रचारासाठी आयोजित जाहीर सभेत त्यांनी हे वक्तव्य केले. कर्डिले हे आमच्यासाठी लकी आहेत, ते यंदा शंभर टक्के निवडून येणार आहेत, असे त्यांनी सांगितले.

पंकजा मुंडे यांनी नरेंद्र मोदी सरकारच्या कामगिरीवर प्रकाश टाकला आणि महायुतीचे सरकार महाराष्ट्रात आणण्याचे आवाहन केले. नरेंद्र मोदींनी वैयक्तिक शौचालय, गॅस सिलेंडर, शेतकरी सन्मान योजना, आयुष्यमान भारत योजना यशस्वीपणे राबवल्या आहेत. नगर जिल्ह्यातील महायुतीच्या उमेदवारांना मतदान करा, कारण विरोधकांना चांगले सरकार चालवता येत नाही, असेही त्या म्हणाल्या.

यावेळी माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, आमदार मोनिकाताई राजळे, भाजपचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, नगराध्यक्ष सत्यजित कदम, युवा नेते अक्षय कर्डिले, तसेच अनेक भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले यांनी उपस्थितांना संबोधित करताना, गोपीनाथ मुंडे यांनी २००९ मध्ये भाजपची उमेदवारी दिली व त्याद्वारे मला नागरिकांना विकास काय असतो हे दाखवून देता आले, असे सांगितले. त्यांनी महाविकास आघाडीच्या काळातील शेतकरी विरोधी धोरणांवर टीका करत, महायुती सरकारच्या शेतकरी हिताच्या योजना आणि मोफत वीज योजनेचे समर्थन केले.

यावेळी माजी खासदार डॉ. सुजय विखे म्हणाले की, महायुतीचे उमेदवार निवडून येतील, यासाठी पालकमंत्री व विखे यांना सर्वांकडे लक्ष द्यायला हवे.

## प्रवक्ते पद गेलं तरी चालेल–नितेश कराळे मास्तरांचा घराणेशाहीवर टीका,पक्षावर संताप

**वर्धा । प्रतिनिधी**



वर्ध्याचे नितेश कराळे मास्तर यांनी आपल्याच पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेसवर घराणेशाहीचा गंभीर आरोप केला आहे. आर्वी आणि वर्धा मतदारसंघासाठी उमेदवारी मिळवण्यासाठी त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडे मागणी केली होती. त्यासाठी त्यांनी इच्छुक उमेदवारीसाठी आवश्यक सर्व प्रक्रिया पूर्ण केल्या होत्या. तथापि, ऐनवेळी वर्धा मतदारसंघ काँग्रेसला दिला गेला, तर आर्वी मतदारसंघ मयुरा अमर काळे यांना देण्यात आला. या निर्णयामुळे नाराज झालेल्या कराळे मास्तरांनी पक्षाच्या घराणेशाहीवर टीका केली आहे.

कराळे मास्तर यांनी सांगितले की, पक्षाने एकाच घरात खासदार आणि आमदार दोन्ही उमेदवारी कशा दिल्या? सामान्य कार्यकर्त्यांना महत्त्व दिलं पाहिजे, त्यांच्या मतांना जागा मिळालं पाहिजे. त्यांनी घराणेशाहीवर टीका करत असं स्पष्ट केलं की, जो कुठला पण पक्ष घराणेशाही करेल, त्याला माझा विरोध असेलच.

नितेश कराळे मास्तरांनी एका पत्रकार परिषदेत आपला संताप व्यक्त केला. त्यांनी सांगितलं की, आर्वी मतदारसंघावर माझा दावा होता, मात्र खासदार अमर काळे यांच्या पत्नीसाठी मतदारसंघ राखण्यात आला. यामुळे लोकांमध्ये नाराजी आहे. मी यावर शरद पवारांशी बोलणार आहे.

त्यांनी पक्षातील निर्णयांवर नाराजी व्यक्त करत, आता मी भाषणं देण्यासाठी शुल्क घेईन. महाविकास आघाडीच्या नेत्यांना याबाबत मी स्पष्ट सांगितले आहे, अशी प्रतिक्रिया दिली.

नितेश कराळे मास्तरांचा हा घोष निश्चितच पक्षात खळबळ माजवणारा ठरला आहे. घराणेशाहीविरोधात आपला आवाज उठवणारे कराळे मास्तर आगामी काळात या मुद्द्यावर आणखी सक्रिय होण्याची शक्यता आहे.

### अहिल्यानगर येथे शंकरमहिमा ग्रंथाचे प्रकाशन

## संग्राम जगताप आणि अभिषेक कळमकर एकाच मंचावर



**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

सद्गुरू शंकर महाराजांच्या जीवनाचे चित्ररूपात मांडणी करणारा 'शंकरमहिमा' ग्रंथाचे प्रकाशन सोहळा अहिल्यानगर येथे संपन्न झाला. ज्येष्ठ चित्रकार वसंत विटणकर यांनी शंकरगीता ग्रंथाच्या आधारे संवादात्मक शैलीत शंकर महाराजांचे जीवन चरित्र मांडले आहे.

या प्रसंगी नगर विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार गटाचे उमेदवार संग्राम जगताप आणि शरद पवार गटाचे उमेदवार अभिषेक कळमकर हे एकाच व्यासपीठावर दिसल्याने राजकीय चर्चेला उधाण आले. प्रमुख पाहुणे म्हणून अखिल भारतीय नाथसंप्रदायाचे महंत योगी पीर रामनाथ महाराज, सोलापूरच्या शुभांगी बुवा, श्री विश्वेश्वर स्वामी महाराज, मंगल भक्तमंडळाचे उपाध्यक्ष धरमचंद कोठारी, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, प्रजापती ब्रह्मकुमारी प्रमिलाबेन जाधव, तसेच शंकर महाराजांचा सहवास लाभलेले लेले महाराज, विजयनाथ केदारी, प्रसाद धर्माधिकारी, कन्हैयालाल शहा, आणि चित्रकार वसंत विटणकर आदी मान्यवर उपस्थित होते.

## देवी दाक्षायणी संस्थानच्या गोशाळेत गोमातांच्या मृत्यूबद्दल खुनाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी

**गंगापूर । प्रतिनिधी**



देवी दाक्षायणी संस्थानच्या लासूरगाव येथील गोशाळेत गेल्या वर्षभरात तब्बल २० गोमाता चाऱ्याअभावी दगावल्याची घटना समोर आली आहे. गोसेवकांनी दोषींवर खुनाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. ही गोशाळा मराठवाड्याच्या कुलस्वामिनी देवी दाक्षायणी संस्थानच्या मालकीची असून, संस्थानाच्या ३५०–४०० एकर जमिनीवर गोमातांसाठी पुरेसा चारा उपलब्ध नसल्याने गोवंशाची दयनीय स्थिती निर्माण झाली आहे.

या प्रकरणाबाबत वैजापूरचे तहसीलदार सुनील सावंत हे पदसिद्ध प्रशासक आहेत. गोसेवक सुनील बारगळ यांनी दिलेल्या माहितीनुसार, संस्थानकडे असलेल्या जमिनीचा योग्य वापर न करता, गोमातेला साधा हिरवा चारा उपलब्ध होत नाही. दोषींवर तत्काळ कारवाई करावी, अशी मागणी गोसेवकांनी केली आहे. गोमातेला राष्ट्रमातेचा दर्जा असूनही त्यांच्या मृत्यूचे कारण प्रशासनाच्या हलगर्जीपणात दडलेले असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

सुनील बारगळ (गोसेवक, वैजापूर) – देवी दाक्षायणी संस्थानकडे मोठ्या प्रमाणात जमीन असूनही गोशाळेत गोमातेला चाऱ्याअभावी दगावावे लागत आहे. या प्रकरणात दोषींवर खुनाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी करतो.

विष्णू हरिश्चंद्रे (व्यवस्थापक, देवी दाक्षायणी संस्थान) – गोमातांसाठी ४०–५० एकर जमीन कुरणासाठी ठेवलेली आहे. गोसेवकांनी केलेली मागणी वरिष्ठांपर्यंत पोहोचवली जाईल, तसेच हिरव्या चाऱ्याची लागवड करण्याबाबत विचार केला जाईल.

***धर्मादाय आयुक्तांची परवानगी न घेता गोवंश विक्री**

धर्मादाय आयुक्तांच्या परवानगीशिवाय संस्थानने काही गोवंशाचा जाहीर लिलाव केल्याचे उघड झाले आहे. त्यामुळे दोषींवर काय कारवाई होते, याकडे सर्वसामान्यांचे लक्ष लागले आहे.

## त्यांच्या पक्षात गेलो नाही म्हणून कारखाना बंद पाडला आघाडीच्या अशोक पवारांची सरकारवर टीका

**उरुळी कांचन । रमेश बनसोडे**

इतर कारखान्यांना ५०० कोटी रुपये दिले. रावसाहेब पवार घोडगंगा साखर कारखान्याला मात्र नियमाने मिळणारे १६० रुपये सुद्धा दिले गेले नाहीत. कारखान्यावर पीएमआरडीएने सर्व्हे झोन दाखवला.

यात त्यांना काहीच कळाले नाही म्हणून ड्रोन सोडले. आणि कारखाना शेतीझोनवर नेला. मी त्यांच्या पक्षात गेलो नाही म्हणून कारखाना बंद पाडला. बऱ्याच भागातील कारखाने मोडीत काढले. इथे संघर्षाला किंमत आहे, त्यामुळे मी पुन्हा कारखाना सुरू करून दाखवणार असल्याची ग्वाही महाविकास आघाडीचे उमेदवार अशोक पवार यांनी दिली. ते कोरेगावमूळ, टिळेकरवाडी व उरुळी कांचन परिसरात प्रचार गावभेट दौऱ्यात बोलत होते.



राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे अधिकृत उमेदवार अशोक पवार यांचा पूर्व हवेलीत गावभेट दौऱ्याचे आयोजन बुधवारी (दि. ६) करण्यात आले होते. त्यावेळी पवार बोलत होते. यावेळी त्यांनी थेऊर, नायगाव, पेठ, प्रयागधाम, कोरेगावमूळ, भवरापूर, टिळेकरवाडी, खामगाव टेक, शिंदवणे, वळती, तरडे, सोरतापवाडी, आळंदी म्हातोबाची या गावांत प्रचार सभा घेण्यात आल्या.

मी पवार साहेबांचा निष्ठावंत कार्यकर्ता

पुढे बोलताना अशोक पवार म्हणाले, मी पवार साहेबांचा निष्ठावंत कार्यकर्ता आहे. मला त्यांच्याकडे घेण्यासाठी किती त्रास दिला तरी पण मी गेलो नाही, सरकारच्या योजना तळागाळापर्यंत पोहोचत नाहीत. विकास होत राहील. परंतु शरद पवार साहेब यांच्यासोबत राहून महाराष्ट्राने निष्ठा शिकविली. मी हवेलीकरांना मान देतो, कारण त्यांचे शरद पवार यांच्यावर अतोनात प्रेम आहे. उत्तुंग असं नेतृत्व आम्हाला लाभले आहे. पूर्वी केलेल्या कामाचे दाखले तुमच्यासमोर आहेत. महाविकास आघाडीचा विजय निश्चित आहे.

## करमाळा विधानसभेचा आमदार ठरवणार नागेशदादा

**सोलापूर । प्रतिनिधी**




आरपीआयचे ज्येष्ठ नेते व बहुजन दिन दलित समाजाचे आदर्श नागेशदादा कांबळे यांनी महायुती आणि महाविकास आघाडीला धक्का देत अपक्ष उमेदवार संजयमामा शिंदे यांना पाठिंबा दिल्याची घोषणा केली आहे. आज आयोजित पत्रकार परिषदेत नागेशदादांनी हा निर्णय जाहीर केला. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, करमाळा तालुक्यात २८००० दलित मतदार असून त्यातले किमान १०००० मतदार त्यांच्यासोबत खंबीरपणे उभे आहेत. ही मते निर्णायक ठरू शकतात आणि त्यामुळे नागेशदादा या निवडणुकीत किंगमेकर होणार असल्याचा दावा त्यांनी केला.

कांबळे म्हणाले, मी कोणत्याही पक्षाच्या नेत्याकडे उमेदवारीची मागणी केली नाही, कारण संविधान संरक्षणासाठी मी दरवर्षी जनजागृती रॅली काढतो. दलित समाजावर होणारे अन्याय मी कदापिही सहन करणार नाही. पुढे बोलताना त्यांनी नमूद केले की संजयमामा शिंदे हेच आमदार होणार असून उद्या शिंदे यांच्या उपस्थितीत होणाऱ्या मेळाव्यात आपला पाठींबा अधिकृतरित्या घोषित करणार आहेत. तालुक्यात भरती-ओहोटीच्या स्थितीप्रमाणेच ही निवडणूक रंगतदार होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

# महायुतीतून मुख्यमंत्रिपदाचा चेहरा कोण ? पंकजा मुंडे यांनी व्यक्त केला विश्वास




**राहुरी । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील आगामी विधानसभा निवडणुकीत महायुतीचे सरकार सत्तेत येईल, असा विश्वास व्यक्त करताना भाजप नेत्या पंकजा मुंडे यांनी महायुतीच्या उमेदवारांना मतदान करण्याचे आवाहन केले. केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजना जनतेपर्यंत पोहोचत असल्याने महायुतीला राज्यात यश मिळेल, असे त्यांनी स्पष्ट केले. आज महाराष्ट्र दौऱ्यावर आलेले केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी महायुती सरकारमध्ये देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होण्याचे संकेत दिले आहेत. यावर प्रतिक्रिया देताना पंकजा मुंडे म्हणाल्या, मुख्यमंत्री कोण होईल, हे ठरवण्याचा अधिकार वरिष्ठ नेत्यांचा आहे.

राहुरी विधानसभा मतदारसंघातील शिराळ-चिचोंडी येथे आयोजित प्रचार सभेत पंकजा मुंडे यांनी भाजप उमेदवार शिवाजीराव कर्डिले (राहुरी मतदारसंघ) आणि मोनिका राजळे (शेवगाव-पाथर्डी मतदारसंघ) यांच्या प्रचारासाठी हजेरी लावली. या सभेला भाजप कार्यकर्त्यांसह मुंडे यांच्या समर्थकांनी मोठी गर्दी केली होती.राहुल गांधी यांच्या संविधानाबद्दलच्या वक्तव्यावर बोलताना पंकजा मुंडे म्हणाल्या, नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान आहेत. संविधानात कोणताही बदल झालेला नाही; उलट ते अधिक सक्षम झाले आहे. अशा फेक नरेटीव्हचा आता काही उपयोग होणार नाही.

# तळोधी (बा) येथे श्रीदत्त मंदिर शताब्दी महोत्सवाचे आयोजन



**तळोधी (बा)। प्रतिनिधी**

श्रीदत्त मंदिर महानुभाव पंच कमेटी व सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी विचारमंच तळोधी (बा) यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीदत्त मंदिर शताब्दी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात श्रीकृष्ण चरित्र निरूपण, श्रीचक्रपाणी प्रभू जन्मोत्सव आणि राज्यस्तरीय ग्रामस्वच्छता अभियानाचा समारोपीय सोहळा संपन्न होणार आहे.

महोत्सवाची सुरुवात ९ नोव्हेंबर रोजी कविश्वर कुलभूषण महंत श्री अष्टूरकर बाबा (श्रीक्षेत्र रिद्धपूर, अमरावती) यांच्या श्रीकृष्ण चरित्र निरूपण कथेने होणार आहे. तसेच, विविध दिनांवर विशेष कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. १० नोव्हेंबरला महानुभाव युवा संमेलन, ११ नोव्हेंबरला कै. डॉ. रा.बो. मेश्राम गुरूजी यांच्या कार्यावर व्याख्यान, १२ नोव्हेंबरला कै. डॉ. तु. वि. गेडाम साहेब यांच्या कार्यावर व्याख्यान, १३ नोव्हेंबरला श्री चक्रधर स्वामींच्या लीळांचे चित्रप्रदर्शन, १४ नोव्हेंबरला प्रा. बाळकृष्ण अंजनगावकर यांचे बालकांचे श्री चक्रधर स्वामी या विषयावर व्याख्यान, १५ नोव्हेंबरला डॉ. विनोद मडावी यांचे आरोग्य विषयक व्याख्यान व मोफत आरोग्य तपासणी शिबिर असे विविध कार्यक्रम होणार आहेत.

१६ नोव्हेंबरला तळोधी नगरीतून पालखी मिरवणूक व शोभायात्रा काढण्यात येणार आहे.

कार्यक्रमाचा उद्घाटन सोहळा ९ नोव्हेंबरला दुपारी ३ वाजता विद्वरतरत्न प.पू. म. श्रीनितिनराजदादा बांधकर, नागपूर यांच्या उपस्थितीत होणार आहे. महोत्सवाचा समारोप व श्रीचक्रपाणी प्रभू जन्मोत्सव सोहळा, तसेच ग्रामस्वच्छता अभियानाचा समारोपीय कार्यक्रम १७ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजता पंजाबी कुळाचार्य महंत श्री कृष्णराजबाबा शास्त्री यांच्या अध्यक्षतेखाली, प्रसिद्ध कवी प्रा. इंद्रजित भालेराव आणि राज्यातील प्रमुख संत-महंतांच्या उपस्थितीत संपन्न होईल. आयोजकांनी या महोत्सवात उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे

# आठवडी बाजाराच्या विकासा साठी भूमिपूजनाला नऊ महिने




**मलकापूर । प्रतिनिधी**

आठवडी बाजाराच्या विकासाच्या दृष्टीने ९ महिन्यांपूर्वी भूमिपूजन सोहळा पार पडला असला तरी प्रत्यक्षात या प्रकल्पाला अजूनही सुरुवात झालेली नाही. डॉ. अरविंद कोलते यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित भूमिपूजन सोहळ्यात नागरिकांना नव्या बाजारपेठेची स्वप्नं दाखवली गेली होती. विद्यमान आमदारांनी १५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून प्रकल्पाला गती देण्याचे आश्वासन दिले होते. पहिल्या टप्प्यात २ कोटी रुपयांची रक्कमही मंजूर करण्यात आली होती.

मात्र, भूमिपूजन सोहळ्याला नऊ महिने उलटले तरी कामाच्या ठिकाणी कोणतीही हालचाल दिसत नाही. नागरिकांमध्ये निराशा वाढत असून, आखिर कधी सुरू होणार हे काम? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. परिसरातील रस्त्यांवरील खड्डे आणि तुटलेल्या पायाभूत सुविधा यामुळे बाजारपेठेची दुर्दशा कायम आहे.

या प्रकल्पाच्या प्रगतीवर कुणाचेही लक्ष नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे. भूमिपूजन केवळ दिखावा ठरल्याची भावना जनतेतून व्यक्त होत आहे, आणि विकासाच्या नावाखाली मिळालेली आश्वासने केवळ वायफळ ठरतील का, असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.

# भूलथापांना आणि पैशाला बळी पडू नका, लोकशाही बळकट करा-डॉ.सुरेश सोनवणे यांचे आवाहन



**गंगापूर । प्रतिनिधी**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कोणत्याही आमिषाला बळी न पडता लोकशाही बळकट करण्याचे आवाहन अपक्ष उमेदवार डॉ. सुरेश सोनवणे यांनी मतदारसंघातील जनसंवाद दौऱ्यात केले. गंगापूर-खुलताबाद विधानसभा मतदारसंघात भूमिपुत्र विजय अभियान दौऱ्याद्वारे मतदारांशी संवाद साधताना त्यांनी आपल्या विचारांची मांडणी केली.

डॉ. सोनवणे यांनी तीसगाव, तिसगाव तांडा, कसाबखेडा, वेरूळ, वेरूळ तांडा, पळसवाडी, पळसगाव, निर्गुडी, गल्लेबोरगाव, अखतवाडा या गावांमध्ये मतदारांशी संवाद साधला. ते म्हणाले की, निवडणुका या लोकशाही बळकट करण्याचे साधन आहेत. मतदारांनी आपला मतदान हक्क विकत देण्याऐवजी आपल्या हक्काच्या आणि स्वच्छ प्रतिमेच्या व्यक्तीला मतदान करणे गरजेचे आहे. प्रस्थापित राजकारण्यांकडून मिळणाऱ्या पैशांच्या आमिषाला बळी पडू नका. आपल्या मतांद्वारे आपल्या तालुक्याचे भविष्य घडवणारा योग्य उमेदवार निवडा. सोनवणे यांनी आपल्या कार्याचा आढावा घेताना सांगितले की, जिल्हा परिषद सदस्य म्हणून अनेक विकास कामे केली असली तरी अनेक वेळा मला अडथळे आले. मात्र, या वेळी मी जनतेसोबत उभा आहे. तुमचा आशीर्वाद मिळाल्यास मतदारसंघाची कायापालट करण्याची ग्वाही देतो. मागील काही महिन्यांपासून मतदारसंघात आयात उमेदवार येऊन आश्वासनांची भूलथाप देत आहेत. यावेळी जागृत होऊन भूमिपुत्राला साथ देण्याची वेळ आहे.

या जनसंवाद दौऱ्यात कैलास राठोड, जयलाल पवार, राजू गर्जे, मनोज आधाणे, श्रीराम राठोड, सागर निकम, गुरुदेव वडोदे, अरुण राठोड, अजय राठोड, विकास चव्हाण, संतोष राठोड यांच्यासह परिसरातील नागरिकांची मोठी उपस्थिती होती.

# राहुरीच्या विकासात निष्क्रिय लोकप्रतिनिधींचा अडथळा-शिवाजी कर्डिले यांचा आरोप



**राहुरी । प्रतिनिधी**


राहुरी विधानसभा मतदारसंघातील विकासाच्या प्रश्नांवर बोलताना भाजपचे उमेदवार आणि माजी मंत्री शिवाजी कर्डिले यांनी सध्याच्या लोकप्रतिनिधींवर कडक शब्दांत टीका केली आहे. निष्क्रिय लोकप्रतिनिधीमुळेच मतदारसंघाच्या विकासाला खीळ बसली आहे, असे ते म्हणाले.

बारागाव नांदूर पाणी योजनेसाठी थकीत वीज बिल माफ करून १७ गावांसाठी योजना सुरू केल्याचे सांगताना कर्डिले यांनी आपल्याला विकासासाठी कटिबद्ध लोकप्रतिनिधी म्हणून जनतेसमोर मांडले. कै. शिवाजीराव गाडे यांच्या कार्याचा उल्लेख करत, गाडे कुटुंबीयांनी सर्वसामान्य जनतेच्या समस्यांना महत्व दिले, मात्र त्यांच्याविरोधात तनपुरे कुटुंबाने अडथळे निर्माण केले असा आरोपही कर्डिले यांनी केला.

कर्डिले यांनी मतदारसंघातील बारागाव नांदूर, कुरणवाडी, चिंचाळे, गडधे आखाडा, बोरटेक, घोरपडवाडी, मोमिन आखाडा, आणि मल्हारवाडी परिसरात प्रचार फेरी काढून मतदारांशी संवाद साधला. या दौऱ्यात माजी जिल्हा परिषद सदस्य धनराज गाडे, विक्रम तांबे, प्रभाजी सुळ, सारंगधर पवार, ज्येष्ठ नेते कैलास पवार, यासह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी हजेरी लावली.

कर्डिले यांच्या मते, सध्याच्या लोकप्रतिनिधींनी दिलेली आश्वासने अपुरीच राहिल्याने जनतेमध्ये नाराजी आहे, आणि याच कारणामुळे गावागावची जनता त्यांच्यामागे एकवटत आहे

# वृध्द पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन पतीने केली पत्नीची हत्या



**गोंडपिपरी । सूरज माडूरवार**

पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन जबर मारहाण करून पत्नीला ठार केल्याची खळबळजनक घटना गोंडपिपरी तालुक्यातील पारगाव येथे दि.(७)गुरुवारी सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास घडली. पारगाव येथील सुमित्रा नारायण आलाम वय(६५) वर्ष ही घरी भांडी घासत असताना तिचा पती नारायण दशरथ आलाम याने डोक्यावर,तोंडावर,हातावर,लाकडी दांड्याने मारून जीवानीशी ठार केले.मृतक सुमित्रा व आरोपी पती नारायण यांच्यात नेहमीच कौटुंबिक वाद व्हायचा नेहमी दारूच्या नशेत पती नारायण हा आपल्या पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन तुला जीवाशी मारून टाकणार अशी वारंवार धमकी द्यायचा .नारायण यांचा एक मुलगा व सून व त्यांची दोन मुले असा यांचा सहा जणांचा परिवार आहे तर एक मुलगा शिक्षनानिमित्त बाहेर असतो पत्नी सुमित्रा भांडे घासत असताना संधी साधून पाठीमागून आरोपी नारायणने पत्नीला जबर मारहाण करून ठार केले.

मृतकाची सून अल्का संतोष आलाम यांनी घटनेची माहिती व तक्रार गोंडपिपरी पोलीसात दिली.तक्रारीची दखल घेत अपराध क्रमांक ३४५/२०२४ कलम १०३(१)इछड प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला. आरोपी नारायण आलाम याला अटक करण्यात आली आहे. पुढील तपास ठाणेदार रमेश हत्तीगोटे करीत आहे.

# अल्पवयीन मुलीचा विवाह आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल



**शेगाव । प्रतिनिधी**


अल्पवयीन मुलीचा विवाह लावल्याप्रकरणी आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींमध्ये राजू निंबटकर, तिरुमाला निंबटकर, भाग्यलक्ष्मी नरसिंगराज येडला (सर्व राहणार राजुरा, जिल्हा चंद्रपूर), सागर बत्तुलवार, घनश्याम बत्तुलवार, मंगला बत्तुलवार, तसेच सागरचे काका-काकू व एक पुजारी (सर्व राहणार शेगाव) यांचा समावेश आहे.

फिर्यादी अल्पवयीन मुलगी बल्लारशाह येथे मैत्रिणीच्या घरी गेली असताना तिची ओळख मैत्रिणीच्या चुलत काकाशी झाली. त्यातून दोघांमध्ये प्रेमसंबंध निर्माण झाले. मुलीच्या पालकांना तिचे वय १८ वर्षांपेक्षा कमी असल्याचे माहीत असूनही, त्यांनी तिचे लग्न १५ जुलै रोजी सागर बत्तुलवार (वय २७) याच्यासोबत लावून दिले.लग्नानंतर काही दिवसांतच पतीला तिच्या जुन्या संबंधांबद्दल माहिती मिळाल्याने दोघांमध्ये वाद सुरू झाले. अखेर १५ ऑगस्ट रोजी तिला माहेरी सोडण्यात आले. बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ अंतर्गत अल्पवयीन मुलीचा विवाह लावल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सिंदेवाहीत पक्षी सप्ताह साजरा

## ठकाबाई तलावात पक्षी निरीक्षण कार्यक्रम





**सिंदेवाही । प्रतिनिधी**

मारुती चितमपल्ली व सलीम अली या प्रख्यात पक्षीतज्ञांच्या जन्मदिनानिमित्त वनविभाग व स्वाब नेचर केअर फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने सिंदेवाही वनपरिक्षेत्रातील ठकाबाई तलाव परिसरात पक्षी निरीक्षणाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम ७ नोव्हेंबर रोजी सकाळी ६:३० ते १०:३० या वेळेत आयोजित करण्यात आला होता.

या उपक्रमाच्या माध्यमातून स्थानिक शाळा-कॉलेजमधील विद्यार्थ्यांना तसेच पक्षीप्रेमी आणि जिज्ञासूंना पक्ष्यांचे निरीक्षण करून त्यांचे पर्यावरणीय महत्त्व समजावून सांगण्यात आले. कार्यक्रमादरम्यान ३ मोरांचे दर्शन घडल्याने उपस्थितांमध्ये विशेष उत्साह निर्माण झाला. हरियाल, धनेश यांसारख्या ३२ पक्ष्यांच्या विविध प्रजातींची नोंद करण्यात आली.

कार्यक्रमात उपस्थितांना डब्ल्यू.पी.एस.आय.चे रोशन धोत्रे, पक्षी निरीक्षक अक्षय मेश्राम आणि स्वप्निल मेश्राम यांनी पक्ष्यांचे निरीक्षण करण्याचे महत्त्व सांगितले. वनपरिक्षेत्र अधिकारी विशाल सालकर आणि स्वाब संस्थेचे अध्यक्ष यश कायरकर यांनी पर्यावरणातील पक्ष्यांचे योगदान आणि त्यांचे संवर्धनाचे महत्त्व पटवून दिले.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन नितीन गडपायले, क्षेत्र सहाय्यक सिंदेवाही यांनी केले. 'ज्ञानधारा अकॅडेमी सिंदेवाही'चे महेश लेनगुरे यांच्या नेतृत्वात विद्यार्थ्यांनी उत्साहात सहभाग घेतला. या वेळी वनपाल सेमस्कर, चौखे, वनरक्षक पेंदाम, जावळे, चिंचोळकर, राठोड, धनविजय आणि स्वाब संस्थेचे बचाव दल प्रमुख जिवेश सयाम यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .

# युती-आघाडी शून्यात नेण्याचे महाविकास आघाडीचे मनसुबे,भाजपाचा जोरदार विरोध

**वर्धा । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला मिळालेल्या विजयामुळे आघाडीतील नेते आणि कार्यकर्त्यांचे मनोबल उंचावले असून, आता त्या विजयाचे अंश वर्धा जिल्ह्यात देखील उमठवण्याचे स्वप्न आघाडी बघत आहे. महाविकास आघाडीने या निवडणुकीत चारही विधानसभा जागा जिंकण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. दुसरीकडे, महायुतीचे नेते भाजपाचा झेंडा फडकवण्यासाठी कठोर परिश्रम करत असून, त्यांच्या मनात एकच उद्दिष्ट आहे - शून्यावर नेणे! दोन्ही पक्षांचा मुख्य मुद्दा म्हणजे विरोधकांना शून्य स्थानावर नेणे आणि युती-आघाडीला पराभूत करणे.

आर्वी विधानसभा: भाजप आणि राकांमध्ये चेहरा बदल, मतदारांमध्ये नाराजी

वर्धा जिल्ह्यातील आर्वी विधानसभा मतदारसंघ यावेळी सर्वाधिक चर्चेत आहे. या मतदारसंघात युती आणि आघाडीने आपले उमेदवार बदलले आहेत. भाजपने सुमित वानखेडे यांना उमेदवारी दिली, तर राकांनं शरद पवार गटाच्या वतीने खा. अमर काळे यांच्या पत्नी मयूरा काळे यांना तिकीट दिले. एकाच घरात आमदार आणि खासदार असल्यानं मतदारांमध्ये नाराजी आहे. पण, दुसरीकडे, सुमित वानखेडे यांनी केलेली कामं मतदार बोलून दाखवत आहेत, आणि त्यांना सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.

देवळी विधानसभा: कांबळे यांच्याविरोधात बकाने यांना लाभदेवळी विधानसभा मतदारसंघात काँग्रेसने सहाव्यांदा आ. रणजीत कांबळे यांना उमेदवारी दिली आहे. पाच वर्षे तोंड न दाखवल्यामुळे आ. कांबळे यांच्याविषयी मतदारांमध्ये नाराजी आहे, आणि याचा फायदा भाजप महायुतीचे उमेदवार राजेश बकाने यांना होण्याची शक्यता आहे. २०१९ मध्ये बकाने यांनी अपक्ष उमेदवार म्हणून दुसऱ्या क्रमांकावर स्थान मिळवले होते, आणि त्यानंतर ते मतदारांशी कायम संपर्कात राहिले आहेत. आता भाजपाने अधिकृत उमेदवारी दिली आहे, आणि त्यावरून काँग्रेस उमेदवार बदलण्याची लाट तयार होऊ लागली आहे.वर्धा विधानसभा: डॉ. पंकज भोयर यांचा विकास बोलतो आहेवर्धा विधानसभा मतदारसंघात भाजपाचे उमेदवार डॉ. पंकज भोयर यांनी केलेल्या विकासकामांमुळे त्यांना प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. त्यांच्या विरोधात काँग्रेसने तिसऱ्यांदा शेखर शेंडे यांना तिकीट दिले आहे. याव्यतिरिक्त, अपक्ष उमेदवार डॉ. सचिन पावडे यांच्या लढाईने परिस्थिती ताणली आहे, आणि त्यामुळे दोन्ही पक्षांमध्ये तणाव निर्माण झाला आहे. वर्ध्यात तिहेरी लढतीचे चित्र आहे.

हिंगणघाट विधानसभा: महाविकास आघाडीचे ड्रामा आणि वांदिले यांचा उफराट प्रतिसाद

हिंगणघाट विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीचा हाय-होल्टेज ड्रामा झाला आहे. महाविकास आघाडीने अतुल वांदिले यांना तिकीट दिल्यानंतर, कृउबा समितीचे सभापती ॲड. सुधीर कोठारी आणि माजी आमदार राजू तिमांडे यांनी राजीनामे दिले. तिमांडे यांनी अपक्ष उमेदवारी दाखल केली आहे. वांदिले यांची लोकसभेपासून केलेली मेहनत गावखेड्यात पोहोचली आहे, आणि त्यामुळे त्यांच्या सभांना गर्दी होऊ लागली आहे.

आ.

कुणावार यांच्यासाठी वैद्यकीय महाविद्यालय डोकेदुखी ठरत आहे, आणि तेली व कुणबी समाज वांदिले यांच्या बाजूने उभा राहण्याच्या तयारीत आहेत. गेल्या दोन वर्षांतील काही घटनांमुळे आ. कुणावार यांच्याविषयी नाराजीचा सूर उमठला आहे. यामुळे हिंगणघाट विधानसभा मतदारसंघात दुहेरी लढत होण्याची शक्यता आहे.निष्कर्ष: वर्धा जिल्ह्यात आगामी विधानसभा निवडणुकीत विविध मतदारसंघात महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात चुरशीची लढत होणार आहे. प्रत्येक पक्ष आपल्या उमेदवारांच्या विकासकामांवर भर देत असून, त्यांना विरोधकांना शून्यावर नेण्याचे उद्दिष्ट आहे.




# विकासयात्रेत जनतेचा भरभरून प्रतिसाद,डॉ.पंकज भोयर यांचे सर्वत्र जल्लोषात स्वागत

**वर्धा । प्रतिनिधी**

वर्धा-सेलू विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार डॉ. पंकज भोयर यांच्या नेतृत्वात झालेल्या विविध विकासकामांमुळे मतदारसंघातील जनतेत उत्साहाचे वातावरण आहे. ज्या-ज्या भागात ते भेट देत आहेत, तिथे त्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात येत असून, नागरिकांकडून त्यांच्या कार्याबद्दल भरभरून प्रतिसाद मिळत आहे.



गुरुवारी (ता. ७) सिंदी (मेघे) आणि शहरातील प्रभाग क्रमांक १२ मध्ये डॉ. भोयर यांच्या स्वागतार्थ भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रभाषा रोड, गौरक्षण परिसर, सानेवाडी, तसेच सिंदी (मेघे) येथील राठी ले-आऊट व हिंदनगर येथे त्यांच्या पदयात्रेला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. बुधवारी सायंकाळी प्रभाग क्रमांक ३ मध्येही त्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले.

सेलू येथील बाजार पेठेतही त्यांनी संवाद यात्रेद्वारे व्यापारी, शेतकरी, व नागरिकांशी चर्चा करत विकासासाठी महायुतीला समर्थनाची मागणी केली. यावेळी त्यांना मोठा प्रतिसाद मिळाला, ज्यात स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी उत्साहाने सहभाग घेतला.

डॉ. पंकज भोयर यांच्या संवाद यात्रा आणि पदयात्रांमुळे मतदारसंघात उत्साहाचे वातावरण असून, विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांचे उमेदवार म्हणून जल्लोषात स्वागत होत आहे.

# जिल्ह्याबरोबरच राज्यातही सहकारी साखर कारखान दारीत गणेशचे नांव सार्थ ठरवु-विवेकभैय्या कोल्हे

**कोपरगाव । प्रतिनिधी**

बदलत्या मुक्त अर्थव्यवस्थेमुळे सर्वच क्षेत्रात स्पर्धा वाढली आहे, सहकारी साखर कारखानदारीसमोर खाजगी उद्योगांचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. या पार्श्वभूमीवर, गणेश सहकारी साखर कारखान्याने आपली कामधेनू भूमिका निभावत ठेवली आहे. गणेश साखर कारखान्याचे लक्ष्य आपल्या सभासदांच्या आर्थीक क्रयशक्तीला वाढवणे आणि त्यासाठी काम करणाऱ्या घटकांचे हित रक्षण करणे हे आहे.

जिल्हा सहकारी बँकेचे संचालक विवेकभैय्या कोल्हे म्हणाले, गणेशच्या माध्यमातून कार्यरत असलेल्या साखर कारखान्याच्या यशाच्या कथेने क्षेत्रातील इतर कारखान्यांनाही दिशा दिली आहे. त्यांनी पुढे सांगितले की, या हंगामात गणेश साखर कारखान्याने ३ लाख मे. टन उसाचे गाळप करण्याचे लक्ष्य ठेवले आहे.



गणेशचे चेअरमन सुधीर लहारे यांच्या नेतृत्वात साखर कारखान्याचा गळीत हंगाम सुरू झाला आहे. या विशेष समारंभात विवेकभैय्या कोल्हे यांच्या हस्ते बॉयलर अग्नीप्रदिपन समारंभ पार पडला. त्या वेळी त्यांनी पुढील विकास कार्यांची चर्चा केली आणि आगामी कार्य योजनांविषयी आपली दृष्टिकोन मांडला. विवेकभैय्या कोल्हे म्हणाले, गणेश क्षेत्रातील शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी जलसंधारण कार्याचे महत्त्व वाढले आहे. निळवंडे धरण आणि इतर जलसंपदा प्रकल्प जलद गतीने कार्यान्वित करण्यासाठी वरिष्ठ स्तरावर आमचे प्रयत्न चालू आहेत. याचाच भाग म्हणून शेतकरी सभासदांनी गणेशच्या विकासात विश्वास दाखवून निवडणुकीत परिवर्तन घडवून आणले आहे.

विवेकभैय्या कोल्हे यांनी शेतकऱ्यांना अधिकाधिक उस लागवडीसाठी प्रोत्साहित केले, तसेच दुग्ध व्यवसाय, मत्स्यपालन आणि बांबुलागवड यासारख्या उपक्रमांच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा करण्याचे महत्त्व स्पष्ट केले.

समारंभाच्या शेवटी, त्यांनी सर्व कारखाना संचालक मंडळ, कार्यकर्ते आणि शेतकरी सभासदांना कारखान्याच्या उद्दिष्टांमध्ये सहकार्य करण्याचे आवाहन केले.

गणेश साखर कारखान्याचा साखर उतारा जिल्ह्यात सर्वाधिक आहे. चालु गळीत हंगामात काटकसर करून येणाऱ्या अडचणींवर मात करण्याचे कार्य सुरू आहे. विवेकभैय्या कोल्हे यांनी आवाहन केले की, गणेशच्या उसाची पळवापळवी होऊ नये, शेतकऱ्यांनी प्राथमिकतेने गणेश कारखान्याच्या गळीत हंगामात सहभाग घ्यावा.

# जामखेडमध्ये भूमिपुत्रांच्या माध्यमातून पक्ष प्रवेशामुळे राम शिंदे यांची जोमात वाढ

**जामखेड । प्रतिनिधी**

कर्जत जामखेड विधानसभा मतदारसंघातील आगामी निवडणुकीला मोठा राजकीय उलथापालथ लागला आहे. गेल्या निवडणुकीसारखीच यंदाही राम शिंदे विरुद्ध रोहित पवार अशी लढत होणार आहे. या निवडणुकीमध्ये महायुतीचे उमेदवार माजी मंत्री राम शिंदे आणि महाविकास आघाडीचे उमेदवार रोहित पवार यांच्यामध्ये कडवी टक्कर होणार आहे.

सध्याच्या राजकीय घडामोडींचा विचार करता, राम शिंदे हे आघाडीवर आहेत. प्रचाराच्या आरंभीच त्यांनी आपल्या नेतृत्वावर विश्वास दाखवत भारतीय जनता पक्षात प्रवेश करणाऱ्या अनेक कार्यकर्त्यांना सामावून घेतले आहे.

गेल्या काही दिवसांत कर्जत जामखेड मतदारसंघातील अनेक गावांमधून कार्यकर्त्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी राम शिंदे यांच्याशी एकजूट दर्शवली आहे.



विशेष म्हणजे जवळा गावातील गोरगरीब जनतेने ५१ हजार रुपयांची मदत राम शिंदे यांना देऊन त्यांना निवडणुकीसाठी सहाय्य केले आहे. हे एक आगळे उदाहरण ठरत असून सध्या जामखेडच्या राजकीय वर्तुळात यावर चर्चा सुरू आहे.

यापूर्वी महाविकास आघाडीच्या उमेदवार रोहित पवार यांच्या नेतृत्वाखाली असलेले कार्यकर्ते देखील राम शिंदे यांच्या कार्याकडे आकर्षित झाले आहेत आणि त्यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आहे. यामुळे, रोहित पवार यांना गंभीर राजकीय फटका बसला आहे.

तसेच, जामखेड तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेसचे बहुसंख्य कार्यकर्ते शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली रोहित पवारांच्या कारभारावर नाराज होऊन भारतीय जनता पक्षात प्रवेश करत आहेत. यामुळे, कर्जत जामखेड मतदारसंघात भाजपाची राजकीय ताकद अधिकाधिक वाढली आहे.

सहा नोव्हेंबरला जामखेड तालुक्यातील अनेक गावांमध्ये भाजपामध्ये प्रवेश करणाऱ्यांचा सिलसिला सुरू झाला. यामध्ये तरडगाव, सोनेगाव, पिंपळगाव, खर्डा, बांधखडक, सरदवाडी, वंजारवाडी आणि कर्जत तालुक्यातील अनेक कार्यकर्त्यांचा समावेश आहे.

राजकीय विश्लेषकांनुसार, राम शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या भूमिपुत्र चळवळीमुळे भाजपाची ताकद वाढली आहे आणि आगामी निवडणुकीत त्यांना याचा फायदा होईल, असे मत व्यक्त करण्यात आले आहे.

# घराच्या स्लॅबवर गळफास घेऊन ४० वर्षीय इसमाची आत्महत्या

**चिमूर । प्रतिनिधी**

चिमूर तालुक्यातील शंकरपूर येथील वार्ड क्रमांक तीनमध्ये एका ४० वर्षीय व्यक्तीने घराच्या स्लॅबवर गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना शुक्रवारी दुपारी तीन वाजताच्या सुमारास घडली.

रामकृष्ण हरीराम तुरारे (वय ४०) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. दुपारच्या वेळी घरी कोणी नसताना त्यांनी स्लॅबच्या सळाखीला दोर बांधून त्यावरून उडी घेतली, ज्यामुळे त्यांचा गळफास लागून मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी येऊन पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालय चिमूर येथे पाठविण्यात आला आहे. आत्महत्येचे कारण अद्याप अस्पष्ट असून पोलिस उपनिरीक्षक रवींद्र वाघ व त्यांचे सहकारी याबाबत अधिक तपास करीत आहेत. मृत तुरारे यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, एक मुलगा आणि एक मुलगी असा परिवार आहे.




# संगमनेरमध्ये बाळासाहेब थोरात व सुजय विखे यांच्यात संघर्षाच्या चर्चा

**संगमनेर । प्रतिनिधी**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांचा बालेकिल्ला असलेल्या संगमनेर मतदारसंघात यावेळी माजी खासदार डॉ. सुजय विखे यांच्या सभांमुळे चर्चेला उधाण आले आहे. विखे यांनी स्वतः उमेदवारी न करता, अमोल खताळ यांना शिंदे गटाकडून रिंगणात उतरवले आहे. यामुळे या निवडणुकीला थोरात आणि विखे यांच्यातील संघर्षाची छायाचित्रे निर्माण झाली आहेत.

**थोरातांचे प्रभावी नेतृत्व**

संगमनेर मतदारसंघात बाळासाहेब थोरात हे १९८५ साली अपक्ष म्हणून निवडून आले होते. त्यानंतर काँग्रेसकडून सलगपणे विजय मिळवित त्यांनी तालुक्यात प्रभावी नेतृत्व प्रस्थापित केले. सहकारी साखर कारखाना, सहकारी दूध संघ आणि शैक्षणिक संस्थांची मजबूत पकड असल्याने थोरात यांचे संस्थात्मक व संघटनात्मक जाळे प्रगतीशील ठरले आहे.



***नवीन संघर्षाचे दृश्य***

संगमनेर मतदारसंघ शिवसेनेच्या कोट्यात असला तरी सेनेचे संघटन फ ुशरज्ञ आहे. यावेळी भाजपचे अमोल खताळ शिंदे गटाकडून उमेदवार म्हणून उभे राहिले आहेत. शिवसेनेच्या संघटनात्मक कमतरतेमुळे भाजपच्या आक्रमक प्रचाराने वातावरण चांगलेच तापले आहे.

**महत्वाचे मुद्दे**

**मुख्यमंत्रिपदाचा दावा:** महाविकास आघाडीची सत्ता आली तर थोरात मुख्यमंत्रीपदाचे दावेदार असू शकतात. या मुद्द्यावर सध्या चर्चा सुरू आहे.

**जयश्री देशमुखवर टीका:** सुजय विखे यांच्या सभेत वसंत देशमुख यांनी थोरात यांच्या कन्या जयश्री देशमुख यांच्यावर आक्षेपार्ह विधान केले, ज्यावर काँग्रेसने तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

**निळवंडे धरणाचा मुद्दा:** थोरात यांच्याकडून निळवंडे धरणाच्या पाण्याचा उपयोग संगमनेर आणि राहाता तालुक्याला मिळवून दिला असल्याचा प्रचार केला जात आहे. तर, विखे पाटीलही या कार्याचे श्रेय घेत आहेत.या निवडणुकीमध्ये थोरात-विखे यांच्यातील संघर्ष अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

# शेवगाव पाथर्डी विधानसभा मतदार संघात निवडणूक प्रचाराची रणधुमाळी

**शेवगाव । प्रतिनिधी**

शेवगाव पाथर्डी विधानसभा मतदारसंघात निवडणुकीच्या रणधुमाळीला सुरुवात झाली आहे. या मतदारसंघात एकूण १५ उमेदवार आपला नशीब आजमावत आहेत. भाजप व मित्र पक्षांच्या उमेदवार म्हणून आमदार मोनिकाताई राजळे यांनी शेवगाव तालुक्यातील श्री शेत्र आव्हाने येथील निद्रिस्त गणपती मंदिरात आणि पाथर्डी शहरातील खोलेश्वर मंदिरात जाऊन आपल्या कमळ चिन्हाच्या प्रचाराची सुरुवात केली. याच गणपती मंदिरात रिक्षा या चिन्हावर निवडणूक लढविणाऱ्या अपक्ष उमेदवार सौ. हर्षदा ताई काकडे यांनी नारळ फोडून आपल्या प्रचाराची शुचिता केली. वंचित आघाडीचे उमेदवार किसनराव चव्हाण यांनीही याच गणपतीला पहिला मान देऊन आपल्या गॅस सिलेंडर चिन्हाच्या प्रचाराची सुरुवात केली.




राष्ट्रवादीकडून उमेदवारी न मिळाल्याने बंडखोरी करणारे माजी आमदार चंद्रशेखर घुले यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल करून किटली या चिन्हाच्या प्रचाराची सुरुवात केली. महाविकास आघाडीचे उमेदवार प्रताप ढाकणे यांनी आपल्याच अकोला गावातून तुतारीच्या चिन्हावर प्रचाराची शुचिता केली.

याशिवाय सुभाष साबळे, आत्माराम कुंडकर, एकनाथ सुसे, सुधाकर चोथे, युनूस शेख, रत्नाकर जावळे, राजेंद्र ढाकणे, शिवहार काळे, सलमान बेग, संदीप शेलार हेही उमेदवार आपला नशीब आजमावत आहेत. राजळे यांच्या प्रचारात अशोक चोरमले, मुकुंद गरजे, अजय रक्ताटे, धनंजय बडे, रामनाथ बंग, अशोक गर्जे यांच्या उपस्थितीने प्रचाराला रंगत दिली. तसेच सौ. हर्षदा ताई काकडे यांच्या प्रचारात जनशक्ती मंचचे महासचिव जगन्नाथ पाटील गावडे, एकनाथ साखर कारखान्याचे चेअरमन सचिन घायाळ, अंतोन हिवाळे, आनंद भंते, बबन राठोड, प्रवीण ढाकणे, रामनाथ कवडे, पृथ्वी सिंह काकडे, रमेश राठोड यांनी सहभाग घेतला. निवडणुकीची रणधुमाळी आता अधिक तीव्र होत असून, सर्व प्रमुख नेत्यांनी आपापल्या प्रचाराची सुरुवात केली आहे.

# बाळासाहेब थोरातांच्या मतदारसंघांमध्ये डॉ.सुजय विखे यांच्या सभांचा धडाका, महायुतीच्या उमेदवारासाठी प्रचारात सक्रिय

**सत्यम भोसले । प्रतिनिधी**

अहिल्यानगर: जिल्ह्यातील राजकारण थोरात आणि विखे घराण्यांच्या गाठीशी निगडीत आहे, असे दिसून येते. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आमदार बाळासाहेब थोरात आणि मंत्री राधाकृष्ण विखे पाटील हे कट्टर राजकीय विरोधक म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात ओळखले जातात. पण आता त्यांच्या पुढच्या पिढीने या विरोधाची धुरा उचलली आहे. गेल्या काही दिवसांपासून घडणाऱ्या घटनांमुळे हे स्पष्ट झाले आहे की, मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे सुपुत्र डॉ. सुजय विखे संगमनेर विधानसभा मतदारसंघात सक्रिय झाले आहेत. त्यांनी प्रचार दौरे आणि सभांचा धडाका लावला होता, तसेच ते या ठिकाणाहून निवडणूक लढण्यास इच्छुक होते. मात्र, मतदारसंघ शिंदे गटाकडे गेल्यानंतर, शिंदे गटाचे अमोल खताळ हे उमेदवार म्हणून रिंगणात आहेत. तरी देखील डॉ. सुजय विखे यांच्या प्रचाराची सक्रियता सध्या दिसून येत आहे, आणि त्यांना प्रतिउत्तर देणारी लढत आमदार बाळासाहेब थोरात यांच्या सुकन्या जयश्री थोरात यांच्याकडून येत आहे.

**थोरात यांच्या बालेकिल्ल्यात विखेच्या सभा**

संगमनेर विधानसभा मतदारसंघ म्हणजे बाळासाहेब थोरात यांचा बालेकिल्ला मानला जातो. या मतदारसंघात काँग्रेसचे नेतृत्व असले तरी, यावेळेस माजी खासदार डॉ. सुजय विखे यांनी सभांचा धडाका लावला आहे. महायुतीच्या माध्यमातून या मतदारसंघाचा ताबा शिंदे गटाने घेतला आहे,

परंतु विखे यांचा प्रभाव आणि प्रचार अजूनही सक्रिय आहे. यापूर्वी बाळासाहेब थोरात या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व १९८५ पासून करत आहेत आणि त्यांच्यामुळे विरोधकांना येथे संस्थात्मक व संघटनात्मक जाळा निर्माण करणे अशक्य झाले आहे. यावेळी मात्र भाजप आणि विखे गट अधिक सक्रिय दिसून येत आहेत.

**संगमनेर विधानसभा मतदारसंघातील निवडणुकीचे महत्त्वाचे मुद्दे**

संगमनेर मतदारसंघात महाविकास आघाडीच्या सरकारची शक्यता चर्चेत आहे, ज्यामध्ये बाळासाहेब थोरात मुख्यमंत्रीपदाच्या दावेदार म्हणून पहिल्या ओळीत येऊ शकतात. दुसऱ्या बाजूला, डॉ. सुजय विखे यांच्या सभेत वसंत देशमुख यांनी जयश्री थोरात यांच्यावर आक्षेपार्ह विधान केल्यामुळे महिलांचा अवमानाचा मुद्दा उपस्थित झाला आहे, ज्यामुळे काँग्रेसने प्रत्येक सभेत या मुद्द्यावर प्रतिक्रिया दिली आहे. महायुती आणि शिंदे गटाच्या प्रचारामुळे लढाई थोरात विरुद्ध विखे अशी दिसत आहे, आणि दोघांमध्ये श्रेय घेण्याची स्पर्धाही स्पष्ट दिसून येत आहे.अशा परिस्थितीत, बाळासाहेब थोरात यांच्या गडात डॉ. सुजय विखे यांच्या सभांनी निश्चितच चांगली चर्चाही निर्माण केली आहे.



# विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलीस विभागाची मोठी कारवाई –१ कोटी ४२ लाखांचा मुद्देमाल जप्त

**वर्धा । प्रतिनिधी**

वर्धा जिल्ह्यातील चारही विधानसभा क्षेत्रात विधानसभा निवडणूक २०२४ च्या पार्श्वभूमीवर आदर्श आचार संहितेचे उल्लंघन करणाऱ्या अवैध दारू निर्मिती, विक्री व वाहतुकीविरोधात पोलीस विभागाने मोठी कारवाई केली आहे. पोलीस अधिक्षक अनुराग जैन आणि अपर पोलीस अधिक्षक डॉ. सागर कवडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा आणि संबंधित पोलीस स्टेशन अधिकारी व कर्मचाऱ्यांनी एकूण १ कोटी ४२ लाख ४ हजार ३३० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



ही कारवाई ७ नोव्हेंबर रोजी करण्यात आली असून, त्यात मोठ्या प्रमाणात देशी, विदेशी मद्य, गावठी दारू व दारु बनविण्याचे साहित्य जप्त करण्यात आले. विशेष म्हणजे, २ लाख ४० हजार रुपये किमतीची ३ दुचाकी वाहनेही जप्त करण्यात आली. यामध्ये ७ लाख ७६ हजार ९०० रुपयांचे दारू बनविण्याचे साहित्य समाविष्ट आहे.

जप्त केलेल्या मुद्देमालात १० लाख १६ हजार ३०० रुपयांच्या ५,१०५ लिटर गावठी दारू, ६० हजार ३० रुपयांच्या ४७.६१ लिटर देशी मद्य, १ लाख २९ हजार १०० रुपयांच्या ७६.८३४ लिटर विदेशी मद्य आणि १ कोटी १९ लाख ८२ हजार रुपयांच्या १,०२,६०२ लिटर सडवा दारूचा समावेश आहे. या कारवाईत १३८ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलीस विभागाने यापुढेही अशा कारवाया सुरू ठेवण्याची घोषणा केली आहे. निवडणूक प्रक्रियेत कोणत्याही प्रकारच्या अनुशासनाच्या उल्लंघनाला कडेकोट कारवाईचा इशारा देण्यात आला आहे.

# सामान्य रुग्णालयात आयुर्वेद दिन साजरा

**वर्धा । प्रतिनिधी**

जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या आयुष विभागात आयुर्वेद दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुमंत वाघ यांच्या हस्ते धन्वंतरि पूजन करून करण्यात आले. यावेळी बाह्य संपर्क अधिकारी डॉ. पवार, डॉ. संजय गाठे, जिल्हा आयुष अधिकारी डॉ. संदिप नखाते, मेट्रन गजभिये, शेंडे, कोडापे, डॉ. अभय मोहिते, डॉ. राजकुमार तळवेकर, डॉ. श्रीधर ताम्हणकर यांच्यासह वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते.




कार्यक्रमादरम्यान, डॉ. सुमंत वाघ यांनी आयुर्वेदाच्या प्रचार आणि प्रसारावर मार्गदर्शन केले. डॉ. संदिप नखाते यांनी आयुर्वेद दिनाच्या संकल्पनेची माहिती देत आयुर्वेदाचे महत्त्व समजावून सांगितले. डॉ. सिमा लोहकरे यांनी यावर्षीच्या आयुर्वेद दिनाच्या घोषवाक्य विश्वस्वास्थ्य के लिए आयुर्वेद यावर मार्गदर्शन केले. तसेच, डॉ. संजय गाठे आणि अश्विनी डोणे यांनी देखील आपल्या विचारांची मांडणी केली.

कार्यक्रमाच्या समारोपात योग शिक्षक डॉ. शंकर तायडे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. शगुफता अहमद, डॉ. योगिता भेंडे, डॉ. रेहान खान, डॉ. अनुपमा जनईकर, श्याम ठाकरे, मनिषा कलवडे, अरुणा भागवत, दिव्या कनेरी आणि प्रमोद इटनकर यांनी सहकार्य केले. आयुर्वेद दिनाच्या या कार्यक्रमाला आयुष विभागातील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

# धक्कादायक.! पुण्यात तिघांकडून पाठलाग करत महिलेवर आळीपाळीने बलात्कार

**पुणे । प्रशांत कुंडकर**

पुण्यातील स्वारगेट परिसरात एक धक्कादायक प्रकार घडला आहे. २५ वर्षीय महिला घरात अंघोळ करत असताना ओळखीच्या एका तरुणाने तिच्या घरात शिरुन तिला बाथरुमधून बळजबरीने बाहेर ओढून जबरदस्तीने तिच्यावर बलात्कार केल्याची घटना घडली आहे.



त्यानंतर पुन्हा महिला चुलत सासरच्या घरी गेली त्यावेळी तिसऱ्या मजल्यावर पाण्याची टाकी तपासणीसाठी गेल्या असताना दोन जणांनी तिचा पाठलाग करुन तिच्यावर आळीपाळीने बलात्कार केला. ही घटना शहरातील स्वारगेट परिसरात घडली आहे.

याबाबत पिडित महिलेने तीन आरोपी विरोधात स्वारगेट पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यावरून पोलिसांनी तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी महिला ही स्वारगेट परिसरात राहण्यास आहे. महिला घरात अंघोळ करत असताना सुरुवातीला एक आरोपी तिच्या घरी आला व त्याने तिच्यावर जबरदस्तीने बलात्कार केला. तसेच तिचा गळा दाबून कोणाला काही सांगितले तर तुला व तुझ्या मुलांना जीवे ठार मारण्याची धमकी दिली.

त्यानंतर पिडित महिला ही तिच्या चुलत सासऱ्यांच्या घरी गेली. त्यावेळी ती तिसऱ्या मजल्यावर पाण्याची टाकी तपासणीसाठी गेली होती. त्यावेळी दोन आरोपी जबरदस्तीने तिच्या मागून येऊन एका रुम मध्ये नेऊन तिच्यावर आळीपाळीने बलात्कार केला. महिलेने या प्रकाराला विरोध केला असता तिला आरोपींनी मारहाण केली व सदर प्रकाराबाबत कोणाला काही सांगितले तर तुझी समाजात बदनामी करण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. याप्रकरणी पुढील तपास महिला पोलिस उपनिरीक्षक एस पाटील करत आहे.

# कुंटणखान्यातील ५ तरुणींची पोलिसांकडून सुटका दोघींच्या पतीनेच विकले वेश्या व्यवसायासाठी

**पुणे । प्रशांत कुंडकर**

पुण्यातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. चांगल्या पगाराची नोकरी देतो, असे सांगुन तरुणींच्या पतिने पुण्यात आणून वेश्या व्यवसायाला लावल्याची घटना घडली आहे. गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक व्यापार प्रतिबंध कक्षाच्या पथकाने या पाच तरुणींची सुटका केली आहे.

हि कारवाई गुरुवारी ७ नोव्हेंबर रोजी रात्री उशिरा करण्यात आली आहे.

या प्रकरणी अनैतिक मानवी वाहतुक व्यापार प्रतिबंध कक्षाचे पोलीस हवालदार रेश्मा कंक यांनी फरासखाना पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद दिली आहे. त्यावरून पोलिसांनी चार जणांना अटक केली आहे. सुमी सौरभ बिश्वास (वय-३५, रा. मरगी गल्ली, क्रांती चौक, बुधवार पेठ, मुळ रा. बोनगाव, जि. चातपाडा, कोलकाता), कुंटणखाना मॅनेजर विक्रम आसीम बिश्वास (वय-२३, रा. मरगी गल्ली, बुधवार पेठ), किकास उजल मंडोल (वय-२१), टॉनी युनुस मुल्ला (वय- ३२) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फ्रिडम फर्म संस्थेचे प्रतिनिधी अब्राहम शशिकांत हेगडे, रेश्मा सुरेंद्र तुपकर, सिमा अजय आरोळे यांनी गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त निखिल पिंगळे यांना बुधवार पेठेतील कुंटणखान्यात अल्पवयीन मुलींकडून वेश्या व्यवसाय करुन घेतला जात आहे, अशी माहिती दिली. त्यावरून पोलीस निरीक्षक संगिता जाधव, हवालदार रेश्मा कंक, सहायक फौजदार कुमावत, छाया जाधव, हवालदार नदाफ, भुजबळ हे बुधवार पेठ येथे गेले. अब्राहम याने वाड्यातील त्यांना एक घर दाखविले. दरवाजा मध्ये कुंटणखाना चालिका सुमी बिश्वास बसली होती. पोलिसांनी तेथे छापा टाकून तपासणी केली. या कारवाई मध्ये त्यांना पाच तरुणी आढळून आल्या आहेत.

याबाबत अधिक माहिती अशी कि, एकीने त्यांच्या घरची आर्थिक परिस्थिती हालाखीची असल्याचे सांगितले. तिच्या मैत्रिणीने बुधवार पेठ येथे काम केल्यास जास्त पैशे मिळतील असे सांगून तिला येथे पाठविले. त्यामुळे ५ महिन्यापूर्वी तरुणी पश्चिम बंगालमधून येथे आली आहे. दुसर्या तरुणीने सांगितले की, मुंबईत घरकाम करत होते, जादा पैशे मिळण्याच्या आमिषाने तिला येथे आणण्यात आले. तिसरी जयपूर वरून येथे आली होती.

दरम्यान, चौथ्या तरुणीला तिचा पती टॉनी याने कुंटणखाना चालिकेला सांगून वेश्या व्यवसाय करण्यासाठी लावले होते. पश्चिम बंगालमधील १९ वर्षाच्या तरुणीसोबत विशाल मंडोल याने लग्न केले. त्यानंतर तो तिला गावाहून पुण्यात घेऊन आला, आणि तिला वेश्या व्यवसायाला लावले. ग्राहकांकडून मिळणार्या ५०० रुपयांपैकी २५० रुपये सुमी बिश्वास आणि मॅनेजर विक्रम बिश्वास वाटून घेत होते. पुढील तपास पोलीस निरीक्षक अजित जाधव करीत

# शेतमालाला भाव, तरुणांना रोजगार देण्यात सरकार अपयशी–शरद पवार

**हिंगणघाट । प्रतिनिधी**

कापूस, सोयाबीन, ऊस पिकांना योग्य भाव न मिळाल्यामुळे शेतकरी कर्जबाजारी होऊन आत्महत्या करत आहेत, असा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी शुक्रवारी हिंगणघाटमधील गोकुळधाम मैदानावर आयोजित सभेत केला. यावेळी ते महाविकास आघाडीचे उमेदवार अतुल वांदिले यांच्या प्रचारार्थ बोलत होते.

शरद पवार म्हणाले, आमच्या काळात महाराष्ट्र नेहमीच नंबर एक होता, पण भाजपच्या हातात सत्ता गेल्यावर राज्याचा विकास मागे गेला आहे. शेतकऱ्यांवर सरकारच्या चुकीच्या धोरणांचा प्रचंड परिणाम झाला आहे. सोयाबीन, कापूस आणि ऊस यांसारख्या पिकांसाठी शेतकऱ्यांना उत्पादन खर्चावर आधारित योग्य भाव मिळत नाही. दुसरीकडे शेतीचा खर्च वाढत आहे आणि सरकार या समस्येवर काहीही ठोस उपाययोजना करत नाही.




पवार यांनी देशातील शेतकऱ्यांची परिस्थिती आणि त्यांच्या आत्महत्यांचा मुद्दा उचलला. ते म्हणाले, देशातील ६० टक्के शेतकरी आहेत. त्यांच्यावर सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे आत्महत्या करण्याची वेळ येत आहे. शेतकऱ्यांना योग्य भाव न मिळाल्यामुळे त्यांच्या जीवनात अंधार आहे, तर दुसरीकडे तरुणांसाठी रोजगाराची वांछित संधी उपलब्ध नाही. देशात बेरोजगारीचे प्रमाण वाढले आहे, आणि शेतकऱ्यांच्या निराशेच्या काळात भाजप सरकार जाती–धर्माच्या राजकारणात अडकले आहे.

शरद पवार यांनी भाजपवर आरोप करत सांगितले की, भाजपला दहा वर्ष सत्ता असताना शेतकऱ्यांच्या भल्यासाठी काहीही ठोस निर्णय घेता आले नाहीत. त्यांनी लोकसभा निवडणुकीत स्वबळावर सत्ता स्थापन करू शकली नाही आणि इतर पक्षांच्या मदतीने सरकार स्थापन केले. केंद्रातील भाजप सरकारला शेतकऱ्यांच्या परिस्थितीची जाणीव नाही. त्यांनी आपल्या सरकारच्या काळात केलेल्या शेतकरी कर्जमाफीचा उल्लेख करत सांगितले की, मी कृषिमंत्री असताना शेतकऱ्यांच्या ७० हजार कोटी रुपयांचे कर्ज माफ केले होते, जेणेकरून शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य मिळाले. सध्या, केंद्र आणि राज्य शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे शेतकऱ्यांना पुन्हा आत्महत्या करण्याची वेळ येत आहे.

शरद पवार यांनी महाविकास आघाडीच्या वतीने विविध योजनांची घोषणा केली. आम्ही सत्तेत आल्यानंतर महालक्ष्मी योजना, कृषी समृद्धी योजना, युवकांसाठी रोजगार योजना, कुटुंब संरक्षण आणि समानतेची हमी यावर काम करू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सभेला माजी गृहमंत्री अनिल देशमुख, उमेदवार अतुल वांदिले, नीतेश कराळे, माजी उपनगराध्यक्ष मुरलीमनोहर व्यास, माजी आमदार सुरेश देशमुख, जिल्हाध्यक्ष सुनील राऊत, माजी आमदार डॉ. वसंत बोंडे, उद्धवसेनेचे उपजिल्हा प्रमुख राजेंद्र खुपसरे, काँग्रेसचे प्रवीण उपासे, पंढरी कापसे, भाईजी मुंजेवार यांच्यासह अन्य नेत्यांनी मार्गदर्शन केले. यावेळी, सुनील डोंगरे, माजी नगरसेविका शुभांगी डोंगरे आणि आरपीआयचे अनिल मून यांनी महाविकास आघाडीच्या उमेदवाराला पाठिंबा जाहीर केला. विजय तामगाडगे यांनी सूत्रसंचालन केले.

**राज्य शासनावर टिका आणि महाविकास आघाडीच्या आश्वासनांचा ठराव**

शरद पवार यांनी राज्य शासनावर टिका करत, विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने पैशांच्या योजना राबविण्याचा सपाटा लावला आहे. मात्र, या योजनांचा खरं स्वरूप जेव्हा जनतेला दिसेल, तेव्हा सर्व सामान्य जनतेची फसगत होईल. महाविकास आघाडी सत्तेवर आली, तर आम्ही सर्व योजनांचे पुनरावलोकन करू आणि त्यांचे लाभ लोकांना मिळवून देऊ, असे त्यांनी सांगितले.

महाविकास आघाडीच्या या वचनामुळे शेतकऱ्यांच्या आणि तरुणांच्या जीवनात सुधारणा होईल, असा विश्वास शरद पवार यांनी व्यक्त केला

# करमाळा तालुक्याचा विकास थांबला; एक संधी देऊन आमदार म्हणून निवडून द्या-प्रा.रामदास झोळ

**विकासाचे खरे चित्र**

**दशरथ आण्णा कांबळे म्हणाले, करमाळा तालुक्यातील प्रस्थापित नेत्यांनी विकासाच्या नावाखाली जनतेची दिशाभूल केली आहे. तालुक्याचा विकास कागदावरच राहिला असून, प्रा. रामदास झोळ यांच्यासारखा आमदार हा तालुक्याच्या खऱ्या विकासासाठी आवश्यक आहे.**



**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा तालुक्यातील गटातटाच्या राजकारणामुळे तालुक्याचा विकास खुंटला असून, सर्वांगीण विकासासाठी मला एकवेळ आमदार म्हणून निवडून द्या, असे आवाहन प्रा. रामदास झोळ यांनी केले आहे. बोरगाव येथे आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते. व्यासपीठावर शेतकरी कामगार संघर्ष समितीचे अध्यक्ष दशरथ आण्णा कांबळे, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते हरिभाऊ मंगवडे, ओबीसी काँग्रेस तालुकाध्यक्ष गफूर शेख, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा कार्याध्यक्ष रवींद्र गोडगे,मायाताई झोळ, जिल्हा युवा नेते गणेश मंगवडे, तालुकाध्यक्ष सुदर्शन शेळके, माजी सरपंच भगवान डोंबाळे आणि रिपब्लिकन पक्षाचे नेते यशवंतराव गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रा. झोळ म्हणाले, करमाळा तालुक्यात रस्ते, पाणी, वीज यांसारखे मूलभूत प्रश्न आजही आहेत. शिक्षण, आरोग्य, रोजगार याबाबतीत तालुका मागासलेला असून, करमाळ्यातील जनतेला वैद्यकीय उपचारांसाठी बाहेरगावी जावे लागते, ही मोठी शोकांतिका आहे. तालुक्याचा सर्वांगीण विकास करण्यासाठी माझे प्रमुख ध्येय शिक्षण, आरोग्य, रोजगार, आणि उद्योगनिर्मिती आहे.मनोज जरांगे-पाटील यांच्या प्रयत्नांमुळे मराठा समाजातील विद्यार्थ्यांना कुणबी दाखले मिळाल्याचे नमूद करून, जात पडताळणीसाठी मुदतवाढ मिळवण्यासही शासनाकडे पाठपुरावा केल्याचे त्यांनी सांगितले.

# करमाळा काँग्रेस कार्यकर्त्यांची नाराजी; पदाधिकाऱ्यांना विचारात घेतले जात नसल्याची खंत

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा तालुक्यात काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांना व पदाधिकाऱ्यांना महाविकास आघाडीच्या निर्णय प्रक्रियेत विचारात घेतले जात नसल्याची खंत युवक काँग्रेस करमाळा तालुका अध्यक्ष संभाजी श्रीमंत शिंदे यांनी व्यक्त केली आहे. त्यांनी म्हटले की, गेल्या दोन-तीन वर्षांत तालुक्यातील काँग्रेस पक्षाच्या उभारणीसाठी विविध आंदोलने व उपक्रम राबवून सामान्य माणसांना न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. महाविकास आघाडीचे उमेदवार नारायण (आबा) पाटील यांच्या नामनिर्देशन पत्र दाखल करताना काँग्रेसच्या एकाही पदाधिकाऱ्याला आमंत्रित केले नसल्याने पक्षात नाराजीचा सूर आहे. या संदर्भात काही दिवसांपूर्वी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते शाहू दादा फरतडे यांनीही अशाच प्रकारची नाराजी व्यक्त केली होती.

संभाजी शिंदे यांनी सूचित केले की, स्थानिक महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून काँग्रेसला वारंवार दुर्लक्षित केले जात असल्यास, तालुका काँग्रेस पदाधिकाऱ्यांना एकत्रित बोलवून त्यांचा विचार घेणार आहेत. त्यानंतर करमाळा तालुका काँग्रेसचे अध्यक्ष प्रतापराव जगताप यांच्या



अध्यक्षतेखाली केंद्राचे माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे आणि माढा लोकसभेचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्यासमोर ही हकीकत मांडली जाईल. काँग्रेसला वारंवार गृहीत धरून निर्णय घेतल्यास पदाधिकारी वेगळा निर्णय घेऊ शकतात, असे सूचक वक्तव्य शिंदे यांनी केले.

# करमाळा तालुक्यात आमदार संजयमामा शिंदे यांना वाढता पाठिंबा; विरोधकांसमोर आव्हान निर्माण

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा विधानसभा निवडणुकीसाठी चुरस वाढत चालली असून आमदार संजयमामा शिंदे यांना विविध गट, पक्ष, आणि संघटनांचा पाठिंबा मिळत आहे. ८ नोव्हेंबर रोजी आर.पी.आय.चे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष नागेश कांबळे यांनी आपल्या कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित करून, आगामी निवडणुकीत दलित समाज संजयमामा शिंदे यांना संपूर्ण ताकदीनिशी पाठिंबा देणार असल्याचे जाहीर केले. त्यांनी सांगितले की, या निवडणुकीत दलित समाज किंगमेकरची भूमिका बजावणार आहे.

आज ९ नोव्हेंबर रोजी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने केमिस्ट्री भवन करमाळा येथे मेळावा घेत संजयमामा शिंदे यांना पाठिंबा जाहीर केला. यावेळी संजय बापू घोलप व मनसेचे इतर पदाधिकारी उपस्थित होते. तसेच जिल्हा नियोजन मंडळाचे सदस्य गणेशभाऊ चिवटे यांनीही आपला पाठिंबा आधीच




जाहीर केला आहे, आणि लवकरच मोठा मेळावा आयोजित करून हा पाठिंबा पुन्हा एकदा दृढ केला जाणार आहे.

राष्ट्रीय समाज पक्ष आणि वंचित बहुजन आघाडी हे देखील पाठिंबा देण्याच्या तयारीत असून, संजयमामा शिंदे यांच्या कॉर्नर सभांमध्ये जनतेचा उत्स्फूर्त सहभाग दिसत आहे. त्यांच्या वाढत्या पाठिंब्यामुळे विरोधकांसाठी ही निवडणूक डोकेदुखी ठरत आहे.

## राष्ट्रवादी प्रवेशाचा मुहूर्त जुळला, मात्र मने जुळेना

# आ.सतीश चव्हाण व वाल्मिक शिरसाठ यांच्यात शाब्दिक चकमक; स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये नाराजीचे वातावरण

**गंगापूर । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने शरद पवार गटाच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांचा विरोध झुगारून, पदवीधर मतदार संघाचे आमदार सतीश चव्हाण यांना अधिकृत उमेदवारी जाहीर केली. या उमेदवारीनंतर पक्षाच्या अंतर्गत गटांमध्ये नाराजीचा सूर उमटताना दिसतोय. स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचे आक्षेप असूनही उमेदवारी देण्याच्या निर्णयामुळे पक्षात धुसफुस वाढली आहे. संपर्क प्रमुख राजेश टोपे यांच्या उपस्थितीत घेण्यात आलेल्या बैठकीत सतीश चव्हाण आणि जिल्हा संघटक वाल्मिक शिरसाठ यांच्यात झालेली शाब्दिक चकमक याच नाराजीचे प्रतिबिंब मानले जात आहे.

**स्थानीय निष्ठावंतांना संधी न मिळाल्याची**



**खंत**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फुट पडल्यानंतर, सतीश चव्हाण यांनी अजित पवार गटात प्रवेश केला. त्यामुळे विधानसभेच्या उमेदवारीसाठी त्यांच्या दावेदारीची शक्यता वर्तवली जात होती. दुसऱ्या फळीतील कार्यकर्त्यांनी स्थानिक उमेदवाराला संधी मिळावी, यासाठी प्रयत्न सुरू केले होते. परंतु राष्ट्रवादीने अचानक चव्हाण यांना उमेदवारी दिल्याने स्थानिक कार्यकर्त्यांच्या अपेक्षांवर पाणी फिरले. यामुळे एक गट नाराज झाला असून, बंडखोरीची शक्यता निर्माण झाली आहे.

**समन्वय बैठकही वादग्रस्त ठरली**

राष्ट्रवादीच्या संभाव्य बंडखोरी टाळण्यासाठी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि खा. सुप्रिया सुळे यांच्या सूचनेनुसार, संपर्क प्रमुख राजेश टोपे यांच्या निवासस्थानी रविवारी समन्वय बैठक घेण्यात आली होती. या बैठकीत गंगापूर तालुक्यातील काही राजकीय विषयांवर चर्चा होत असताना, आमदार चव्हाण यांनी अन्य नेत्यांविषयी अपशब्द वापरल्याचे आरोप जिल्हा संघटक वाल्मिक शिरसाठ यांनी केले. यावरून दोघांमध्ये शाब्दिक चकमक झाली. वाद विकोपाला जात असल्याचे लक्षात येताच माजी जिल्हाध्यक्ष सुधाकर सोनवणे यांनी हस्तक्षेप करत वाद शांत करण्याचा प्रयत्न केला.

**अंतर्गत मतभेदांनी पक्षातील तणाव वाढवला**

या घटनेनंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील अंतर्गत धुसफुस स्पष्टपणे समोर आली आहे. स्थानिक निष्ठावंत कार्यकर्त्यांना दुर्लक्ष करून बाहेरून आयात उमेदवाराला संधी दिल्यामुळे पक्षात नाराजीची भावना आहे. आगामी निवडणुकीत या मतभेदांमुळे पक्षावर विपरीत परिणाम

# मूल येथे सुधीर मुनगंटीवार यांची भव्य बाईक रॅली, जनतेचा मिळाला उत्स्फूर्त प्रतिसाद





**मूल । प्रतिनिधी**

बल्लारपूर विधानसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार यांच्या समर्थनार्थ आज मूल येथे भव्य बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले. दुपारी १ वाजता इको पार्क येथून रॅलीला सुरुवात झाली. युवक, युवती, तसेच वृद्ध नागरिकांनी मोठ्या संख्येने या रॅलीत सहभाग घेतला, ज्यामुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.सुधीर मुनगंटीवार यांच्या नावाचा जयघोष, घोषणांनी आणि 'या मातीच्या सेवेसाठी यावे सुधीर भाऊ' या गाण्याच्या स्वरांनी संपूर्ण शहर भारावून गेले. मुनगंटीवार यांचे विकासकेंद्रित नेतृत्व, समाज घटकांसाठीची आस्था आणि प्रामाणिक कार्यपद्धती यामुळे मतदारांमध्ये त्यांच्याविषयी दृढ विश्वास निर्माण झाला आहे, असे मत अनेकांनी व्यक्त केले. रॅलीच्या मार्गात चौकाचौकात फटाके फोडून आणि पुष्पवृष्टी करून जनतेने आपला पाठिंबा दर्शवला. महायुतीच्या घटक पक्षांचे नेते व भाजपाचे पदाधिकारी देखील उपस्थित होते, ज्यांनी जनतेला सुधीर मुनगंटीवार यांच्या विजयासाठी प्रेरित केले.

इको पार्क येथून सुरु झालेली ही रॅली मूल शहरातील प्रमुख मार्गांवरून पार पडली, ज्यामध्ये सुधीर मुनगंटीवार यांना मिळणाऱ्या व्यापक जनसमर्थनाचे दर्शन घडले.

# करमाळा निवडणुकीत शिवसेनेचे महेश चिवटे ठरले गेमचेंजर

**सोलापूर । प्रतिनिधी**

गेल्या तीस वर्षांपासून शिवसेना धनुष्यबाण चिन्हावर करमाळा विधानसभा निवडणूक लढवत आहे. यंदाच्या निवडणुकीत ही जागा भाजपकडे जाणार असल्याचे लक्षात येताच शिवसेना जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी सक्रिय भूमिका घेत मतदारसंघ शिवसेनेकडे राखण्यात यश मिळवले. चिवटे यांनी भाजपाचे दिग्विजय बागल यांना शिवसेनेत सामील करून उमेदवारी बहाल केली आणि करमाळा तालुक्यातील राजकारणात गेमचेंजर ठरले.



गेल्या नऊ वर्षांपासून सत्तेपासून दूर असलेला बागल गट यंदाच्या निवडणुकीत उभा राहील का नाही, असा प्रश्न उपस्थित झाला होता. बागल महायुतीचा भाग असला तरी विद्यमान आमदार संजय मामा अजित पवार समर्थक असल्याने हा मतदारसंघ राष्ट्रवादीच्या बाजूला जाण्याची शक्यता होती. भाजपच्या महिला प्रदेश उपाध्यक्षा रश्मी बागल यांनी भाजपकडून उमेदवारी मिळवण्यासाठी प्रयत्न केले, मात्र त्यास विरोध झाला.

महेश चिवटे यांनी भाजपचे जिल्हा सरचिटणीस गणेश चिवटे यांना शिवसेनेत आणून त्यांना धनुष्यबाण चिन्हावर उमेदवारी देण्याचा आग्रह धरला. या संदर्भात आठ दिवस चर्चा झाल्या. अखेर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी संवाद साधून शिवसेनेची उमेदवारी दिग्विजय बागल यांना देण्याचे ठरले.

मुख्यमंत्री शिंदे यांच्या प्रतिमेचा बागल गटाला फायदा होत असून धनुष्यबाण चिन्ह मिळाल्याने आणि जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांनी केलेल्या विकासकामांमुळे बागल गट पुन्हा रेसमध्ये आला आहे. पूर्वी करमाळ्याच्या लढतीत संजय मामा शिंदे व नारायण पाटील यांच्यातच मुख्य स्पर्धा असेल, असे मानले जात होते. मात्र, मुख्यमंत्री शिंदे यांच्या सभेनंतर दिग्विजय बागल मैदानात उतरले असून तिरंगी स्पर्धा रंगली आहे.

या राजकीय डावपेचात जिल्हाप्रमुख महेश चिवटे करमाळा विधानसभेच्या रणांगणात गेमचेंजर ठरले आहेत. आता चिवटे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेचा विजय निश्चित होईल का, याची राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे.

# बदलापूरच्या 'त्या' शाळेत ब्ल्यू फिल्म बनवायचे, शरीराचे अवयव विकायचे, नाना पटोले यांचे खळबळजनक आरोप

**नांदेड । मनोज उतेकर**

बदलापूर च्या शाळेत मुलींचे ब्ल्यू फिल्म बनवायचे असा खळबळजनक दावा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. त्यामुळे याप्रकरणाला पुन्हा एकदा नवं वळण मिळण्याची शक्यता आहे. काही महिन्यांपूर्वी बदलापूरमधील एका शाळेत घडलेल्या अत्याचाराच्या घटनेमुळे महाराष्ट्र हादरला होता.

त्यातच आता नाना पटोले यांनी केलेल्या या दाव्यामुळे या प्रकरणात नेमकं काही लपवलं तर जात नाहीये ना असा सवालही उपस्थित होतोय.

नाना पटोले हे नांदेडमध्ये प्रचार सभेत बोलत होते. यावेळी त्यांनी महायुती सरकारच्या काळातील राज्यातील परिस्थितीबद्दल बोलताना बदलापूरच्या घटनेचा उल्लेख केला. एवढंच नाही तर या शाळेत अवयव विक्रीही करायचे असाही आरोप त्यांनी केला आहे. ही शाळा राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांच्याशी संबंधित असून या शाळेत लहान मुलींचे अश्लील चित्रफिती तयार करणे, अवयव विक्री करणे अशा पद्धतीचे उद्योग सुरू



असल्याचा आरोप नाना पटोले यांनी एका जाहीर सभेत केला आहे. आरएसएसशी संबंधित शाळा असल्यानेच सरकारने या शाळेवर मेहेरबानी दाखवल्याचा आरोपही पटोलेंनी केलाय.

नाना पटोले काय म्हणाले?

बदलापूरमध्ये चार-पाच वर्षांच्या मुलींवर अत्याचार झाले. दोनच नाही, तर असंख्य मुलींवर अत्याचार झाला, कोर्टाने चौकशीचे आदेशही दिले, पण आरएसएसची शाळा म्हणून राज्यातल्या सरकारने त्यांच्या संचालक मंडळावर कारवाई केली नाही. एका माहितीच्या अधिकारातून एका व्यक्तिने केस केली. त्या शाळेत ब्ल्यू फिल्म, पिक्चर तयार करणे, शरिराचे अवयव विकण्याशी संबंधीत एक जनहित याचिका टाकण्यात आली आहे असं नाना पटोले म्हणाले आहेत.

दरम्यान, बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातील मुख्य आरोपीला २३ सप्टेंबर रोजी दुसऱ्या एका गुन्ह्याप्रकरणी तळोजावरून ठाण्यात आणण्यात येत होतं. त्याचवेळी मुंब्रा बायपासजवळ अचानक अक्षय शिंदेने पोलिसाची बंदूक खेचली आणि पोलिसांवर गोळ्या झाडल्याचं समोर आलंय, ज्यामध्ये एक पोलीस अधिकारी जखमी झाला.

ज्यानंतर पोलिसांनी स्व-संरक्षणार्थ गोळीबार केला. ज्यामध्ये त्याचा मृत्यू झाला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. या एन्काऊंटरवरुनही अनेक सवाल उपस्थित केले गेले आहेत. त्यातच आता नाना पटोले यांनी शाळेवर गंभीर आरोप केल्याने या प्रकरणात बरेच सवाल उपस्थित होत आहेत.

# महायुती सरकार बहुजन समाज आणि शेतकरीविरोधी-नरेंद्र पहाडे यांचा आरोप

**भंडारा । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील महायुती सरकार हे बहुजन समाज आणि शेतकरीविरोधी असून सत्ता परिवर्तन गरजेचे आहे, असा आरोप भंडारा-पवनी विधानसभा मतदारसंघातील जनतेचे उमेदवार नरेंद्र पहाडे यांनी प्रचार सभेत केला. ओबीसी समाजासाठी जातिनिहाय जनगणना न करणे, लोकसंख्येच्या आधारावर आरक्षण न देणे, तसेच धान उत्पादक शेतकऱ्यांना स्वामिनाथन आयोगाची अंमलबजावणी न केल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत असल्याचा दावा त्यांनी केला.

महायुती सरकारने एससी, एसटी आरक्षणाचे उपवर्गीकरण करून समाजात तेढ निर्माण करण्याचा कुटील प्रयत्न केला आहे. ओबीसी आरक्षणाचा मुद्दा पुढे करून राज्यातील स्वायत्त संस्थांच्या निवडणुका प्रलंबित ठेवण्यात आल्या असल्याचे पहाडे यांनी नमूद केले. तसेच, धान पिकाला हमीभाव न मिळाल्याने शेतकरी तोट्यात असून आर्थिक संकटात आहेत. औद्योगिक क्षेत्रात नवीन उद्योग नसल्याने भंडारा-पवनी तालुक्यात सुशिक्षित बेरोजगारीची समस्या वाढली असल्याचे त्यांनी सांगितले.

महायुती सरकारने लहान-मोठे उद्योग भंडारा-पवनी तालुक्यात आणणे अपेक्षित होते, मात्र हे उद्योग गुजरातमध्ये नेण्यात आल्याचा आरोप पहाडे यांनी



केला. मोठ्या उद्योजकांचे १६०० कोटींचे कर्ज माफ केले जाते, पण शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले जात नसल्याचे त्यांनी नमूद केले. त्यामुळे हे सरकार शेतकरीविरोधी असल्याचा आरोप त्यांनी केला.सत्ताधाऱ्यांना सत्तेतून खाली खेचून धडा शिकविण्याची वेळ आल्याचे सांगत पहाडे यांनी मतदारांना सत्ता परिवर्तनासाठी मतदानाची विनंती केली. यावेळी विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, शेतकरी, शेतमजूर, कामगार, भूमिहीन नागरिक, आणि सुशिक्षित बेरोजगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डोक्यावरचे छप्पर काढून अंगावर चादर टाकण्याचे पाप महायुती सरकारने केले - चरण वाघमारे

**भंडारा । प्रतिनिधी**

सत्ताधारी महायुती सरकारने गद्दारांना ५० खोके दिले, तर लाडक्या बहिणींना फक्त दीड हजार रुपयात समाधान करीत आहे, असा गंभीर आरोप महाविकास आघाडीचे उमेदवार चरण वाघमारे यांनी केला आहे. तुमसर तालुक्यात विविध गावांमध्ये प्रचार सभा घेताना त्यांनी सत्ताधाऱ्यांवर तीव्र शब्दात टीका केली.




लोकसभा निवडणुकीत ईडी आणि सीबीआयचा गैरवापर करून सत्ता मिळवण्याचा प्रयत्न महायुती सरकारने केला, मात्र महाराष्ट्रातील जागृत जनतेने तो प्रयत्न हाणून पाडला. आता सुडाचे राजकारण सुरू आहे, असे वाघमारे म्हणाले. त्यांनी आपल्या आमदारकाळातील कामगिरीबद्दल सांगताना, मी मतदारांच्या हितासाठी काम केले. मात्र, सध्याच्या आमदारांनी मतदारांचे मत स्वतःच्या फायद्यासाठी वापरले आहे, असे ते म्हणाले.

महायुती सरकारवर शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडल्याचा आरोप करताना वाघमारे म्हणाले, शेतीसाठी आवश्यक असलेल्या साधनांच्या किंमती वाढल्या असून, शेतमालाला योग्य भाव मिळत नाही. धानाला बोनस नाही, आणि पिकविम्याचा लाभही मिळत नाही. शेतकऱ्यांना संकटात टाकणारे सत्ताधारी यांना जनता माफ करणार नाही, असे सांगत शेतकऱ्यांच्या नावाने तिजोरी भरणाऱ्यांवर वाघमारे यांनी निशाणा साधला.

तुमसर-मोहाडी तालुक्यातील सुशिक्षित तरुणांना रोजगाराच्या संधी नाकारल्या जात असून, बाहेरील तरुणांना संधी दिल्या जात आहेत, असे सांगत वाघमारे म्हणाले, स्थानीय तरुणांवर होणारा हा अन्याय थांबवणे आवश्यक आहे. महागाईने सामान्य जनतेचे कंबरडे मोडले असून, महायुती सरकारने डोक्यावरचे छप्पर काढून अंगावर चादर टाकण्याचे काम केले आहे.

वाघमारे यांनी सरकारवर जाहिरात खर्चावरूनही टीका केली. जर तुमच्या योजना जनतेच्या हिताच्या आहेत, तर जाहिरातीवर शेकडो कोटी रुपये खर्च करण्याचे काय कारण? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

चरण वाघमारे यांनी महालगाव, ब्राह्मणटोला, वारपिंडकेपार, सोंड्या, सक्करदरा, घानोड, कवलेवाडा, आणि येदरबुची या गावांना भेट देत प्रचार केला. यावेळी ग्रामस्थांनी चरणभाऊ आगे बढो, हम तुम्हारे साथ हैं अशा घोषणा देत वाघमारे यांचे स्वागत केले.

## हातभट्टीवाला सोनू बडवाईकला एमपीडीए अंतर्गत कारवाई; भंडारा कारागृहात रवानगी

**भंडारा । प्रतिनिधी**



पीपरा, तालुका तुमसर येथील ईश्वर उर्फ सोनू नारबा बडवाईक (वय २९) याला, हातभट्टी दारू व्यवसाय आणि गुन्हेगारी कृत्यांमध्ये सातत्याने सहभागी असल्यामुळे एमपीडीए कायद्यांतर्गत स्थानबद्ध करून भंडारा जिल्हा कारागृहात रवानगी करण्यात आली आहे. स्थानिक पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोनू बडवाईक याने पीपरा परिसरात हातभट्टीच्या दारूचे उत्पादन आणि विक्री करून हातभट्टीवाला अशी ओळख निर्माण केली होती.

सोनू बडवाईकवर तुमसर पोलीस ठाण्यात हातभट्टी दारू निर्मिती व विक्रीचे सहा गुन्हे दाखल आहेत. या गुन्ह्यांमुळे परिसरात सार्वजनिक सुव्यवस्थेवर विपरीत परिणाम होऊन नागरिकांमध्ये दहशत निर्माण झाली होती. यापूर्वी त्याने पैसे वापरून दारूच्या गुन्ह्यातून सुटका मिळवली होती, मात्र यावेळी एमपीडीए कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात आली आहे.

भंडारा जिल्हा पोलीस अधीक्षक नुरुल हसन पांये यांच्या मार्गदर्शनाखाली, सोनू बडवाईकविरुद्ध एमपीडीए कायद्यानुसार प्रस्ताव तयार करण्यात आला. जिल्हाधिकारी डॉ. संजय कोलते यांनी या प्रस्तावाला ८ नोव्हेंबर २०२४ रोजी मंजुरी दिली, ज्यामुळे तात्काळ सोनू बडवाईकला स्थानबद्ध करून भंडारा जिल्हा कारागृहात ठेवण्यात आले.

सदर कारवाईमध्ये पोलीस अधीक्षक नुरुल हसन, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक नितीनकुमार चिंचोडकर (गुन्हे शाखा), पोलीस निरीक्षक महादेव आचरेकर (तुमसर पोलीस ठाणे), पोहवा जयसिंग लिल्हारे, पोहवा राजेश पंचबुधे, पोना अंकोश पुराम, आणि पोना मार्कंड डोरले यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

भविष्यात देखील अशा समाजविघातक प्रवृत्तीच्या गुन्हेगारांवर एमपीडीए अंतर्गत कडक कारवाई करण्यासाठी भंडारा पोलिस प्रशासन सतर्क असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे

## डॉ.सुजय विखे पाटील यांचा मतदारांशी संवाद; राधाकृष्ण विखे पाटील यांच्या विजयासाठी कमळ चिन्हासमोरील बटण दाबण्याचे आवाहन

**शिर्डी । प्रतिनिधी**

लोणी खुर्द, मापारवाडी आणि परिसरातील विविध गावांमध्ये भेट देत डॉ. सुजय विखे पाटील यांनी मतदारांशी थेट संवाद साधला. मतदारांच्या घराघरात जाऊन त्यांच्या समस्या जाणून घेत पक्षाच्या विकास योजना, धोरणे आणि पुढील संकल्पना उलगडून सांगितल्या. त्यांनी राधाकृष्ण विखे पाटील यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्यासाठी कमळ चिन्हासमोरील बटण दाबण्याचे आवाहन केले.



महायुतीच्या प्रचाराला मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. महायुती सरकारच्या योजनांचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांचा मतदानाचा कल महायुतीकडे दिसून येत आहे. मुख्यमंत्री 'माझी लाडकी बहीण' योजनेमुळे महिला मतदारांमध्ये विशेष उत्साह जाणवत असून, या योजनेमुळे प्रचारात महिलांची सक्रियता ठिकठिकाणी दिसून येत आहे.लोणी खुर्द दौऱ्यात डॉ. सुजय विखे पाटील यांच्यासोबत स्थानिक नेते, पदाधिकारी आणि असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते. मतदारांना पक्षाच्या भूमिकेबाबत माहिती देताना, राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अनुभवी नेतृत्वाखालील विकास कामांची हमी आणि भविष्यातील विकास प्रक्रियेचे आश्वासन दिले. विविध गावांमध्ये ग्रामस्थांनी डॉ. विखे पाटील यांचे जल्लोषात स्वागत केले आणि पक्षाला संपूर्ण पाठिंबा देण्याचे आश्वासन दिले.

## आ.राम शिंदे यांना विक्रमी मतांनी विजयी करावे-अप्पासाहेब ढगे

**जामखेड । प्रतिनिधी**



कर्जत-जामखेड मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार आणि भूमिपुत्र आमदार राम शिंदे यांना विक्रमी मतांनी विजयी करावे, असे आवाहन भाजपा युवामोर्चा कोषाध्यक्ष अप्पासाहेब ढगे यांनी केले आहे. शिंदे यांनी मंत्रीपदाच्या काळात जलसंधारण विभागांतर्गत जलयुक्त शिवार योजना प्रभावीपणे राबवली असून, कर्जत-जामखेड मतदारसंघात रस्ते कामे गावोगावी, वाड्यावस्त्यांपर्यंत नेली आहेत. यामुळे मतदारांशी त्यांची दृढ नाळ जुळली असल्याचे ढगे यांनी सांगितले.आमदार राम शिंदे यांनी गेल्या २० वर्षांत आपल्या मतदारसंघासाठी अविरत कार्य केले आहे, ज्यामुळे त्यांची ओळख महाराष्ट्रात वेगळी निर्माण झाली आहे. जामखेडचा भूमिपुत्र म्हणून त्यांनी कर्जत-जामखेड मतदारसंघ सुजलाम-सुफलाम करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची दखल जनतेने घेतली आहे. आगामी निवडणुकीत शिंदे यांना २० तारखेला मतदान रुपी आशीर्वाद देऊन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे, असे आवाहन अप्पासाहेब ढगे यांनी जनतेला केले आहे.

## आधारभूत खरेदी योजना अंतर्गत धान नोंदणी व खरेदीवर संस्थांचा बहिष्कार प्रशासनाला निवेदन

**चिमूर । शेषराव राऊत**

आदिवासी विकास महामंडळ नाशिक द्वारे चंद्रपूर जिल्ह्यातील आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था तर्फे धान करीत असतात. परंतु यावर्षी विविध मागण्यासाठी नोंदणी व खरेदीवर बहिष्कार टाकण्यात आलेला आहे.

आधारभूत किंमत खरेदी योजना अंतर्गत दरवर्षी शेतकऱ्यांची नोंदणी, व त्यानंतर नोंदणीकृत शेतकऱ्यांकडून धान खरेदी करीत असतात. शासनाने मागील २-३ वर्षापासून नोंदणीकृत शेतकऱ्यांना सरसकट बोनस जाहीर केला असून ९०% शेतकरी हे फक्त बोनसच्या लाभाने नोदणी करीत असतात. मात्र केंद्रांत धान विक्री न केल्याने याचा तिळमात्रही फायदा खरेदी संस्थांना होत नसून संस्था ह्या शेतकर्यांचे फायद्या करिता नोंदणी करीत आहेत. त्यातच शासन निर्णयानुसार संस्थांनी खरेदी केलेल्या मालाची उचल २ महिन्यांचे आत होणे गरजेचे असते. मात्र महामंडळ नाशिक यांचे कडून दरवर्षी मालाची उचल करताना तब्बल ८ ते १० महिन्यांचा कालावधी लागत आहे. त्यामुळे संस्थांना अवाजवी घटीचा सामना करावा लागत असून याची भरपाई दिड पटीने संस्थांकडून वसुली केली जास्त असल्यामुळे उत्पन्नापेक्षा खर्च जास्त होत आहे. त्यामुळे महामंडळाने खरेदी मालाची उचल २ महिन्यांचे आत करावे, महामंडळाचे चुकीचे धोरणाने मालाची अवाजवी घट आल्याने ती महामंडळाने मंजूर करावी, तसेच खरेदी केंद्राचे आज पर्यंतचे माल राहील तोपर्यंतच्या गोदाम भाडे पूर्णपणे द्यावे, हमाली पूर्णपणे द्यावी, अश्या विविध मागण्यासाठी आदिवासी सहकारी संस्थांनी आधारभूत धान खरेदी योजनेकरीता करण्यात येणाऱ्या शेतकरी नोदणी वर बहिष्कार टाकलेला असून संस्थांच्या मागण्या तत्काळ पूर्ण काव्या, अशी मागणी संस्थांनी केलेली आहे. व याचे निवेदन आदिवासी सहकारी संस्थांचे मार्फतिने प्रादेशिक व्यवस्थापक, आदिवासी विकास महामंडळ नाशिक, कार्यालय चंद्रपूर, जिल्हा अधिकारी कार्यालय, चंद्रपूर यांना देण्यात आलेले आहे.

## पार्वतीबाई किसन गायकवाड यांचे निधन

**सोलापूर । प्रतिनिधी**



निलज येथील पार्वतीबाई किसन गायकवाड (वय ८५) यांचे आज सकाळी ११ वाजता राहत्या घरी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, नातवंडे असा परिवार आहे. गावात धार्मिक स्वभावामुळे सर्वजण त्यांना अक्का म्हणत असत. त्या बाळासाहेब गायकवाड, शहाजी गायकवाड व वालचंदनगर येथील शालन जाधव यांच्या मातोश्री होत.

## मूल तालुक्याच्या औद्योगिक विकासात मुनगंटीवार यांचे भगीरथ प्रयत्न,१३ वर्षात उभे राहिले ११ उद्योग

**मूल । प्रतिनिधी**

मागील १३ वर्षांत चंद्रपूर जिल्ह्यातील मूल तालुका औद्योगिक विकासात आघाडीवर असून, एकूण ११ उद्योगांची स्थापना झाली आहे. २०११ पासून येथील औद्योगिक वसाहतीत उद्योगांच्या स्थापनेला सुरुवात झाली, ज्यामध्ये ४०७५ लोकांना प्रत्यक्ष रोजगार मिळाला आहे. यापैकी ६ उद्योग प्रस्तावित असून, या उद्योगांचे बांधकाम अंतिम टप्प्यात आहे.

मूल तालुका एकेकाळी शेतीप्रधान असून, २००९ मध्ये सुधीर मुनगंटीवार यांची आमदार म्हणून निवड झाल्यापासून तालुक्यात औद्योगिक प्रगती सुरू झाली. २०११ पासून विविध कंपन्यांनी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करत तालुक्यात उद्योगांची स्थापना केली. मुनगंटीवार यांच्या पुढाकारामुळे औद्योगिक वसाहतीत जी.आर. कृष्णा फेरो अलाईड, ग्रेटा एनर्जी, राजुरी स्टील अलाय यांसारखे उद्योग स्थापन झाले आहेत. प्रस्तावित उद्योगांचे आकडेवारी मुलात ६ प्रस्तावित उद्योगांमध्ये एकूण २६०० लोकांना रोजगाराची संधी उपलब्ध होईल. नवीन उद्योगांच्या स्थापनेनंतर एकूण ४०४५ लोकांना नोकरी तसेच हजारो युवकांना अप्रत्यक्ष रोजगार प्राप्त होणार आहे.



### मंत्री विखे पाटील यांचा आ.बाळासाहेब थोरात यांच्यावर हल्लाबोल

## शिर्डी मतदारसंघात विकासाची नवी दिशा विरोधकांच्या निष्क्रीयतेवर जोरदार टीका

**संगमनेर । प्रतिनिधी**

काही वर्षं मंत्रिपद भूषवूनही तालुक्यात आवश्यक बदल घडवू न शकणारे माजी मंत्री बाळासाहेब थोरात, आता मतदारांची दिशाभूल करून त्यांच्यात भीती निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र, आमचा सुज्ञ मतदार त्यांच्या खोट्या आरोपांना बळी पडणार नाही, अशी कठोर टीका महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली. महायुतीच्या प्रचारार्थ तालुक्यातील हजारवाडी, पानोडी, पिंपरी लोकी आणि अजमपुर या गावांमधील बैठकीत मंत्री विखे पाटील यांनी मतदारांशी संवाद साधला. या बैठकीत मतदारांनी मंत्री विखे पाटील यांचे जोरदार स्वागत केले, तर लाडक्या बहिणीही या स्वागतासाठी मोठ्या संख्येने हजर होत्या.



***विकासाच्या योजनेवर ठाम विश्वास***

विखे पाटील म्हणाले की, निळवंडेचे पाणी आल्याने या भागाचा विकास साध्य झाला आहे. महायुती सरकारने विविध योजनांच्या माध्यमातून जनतेला आधार दिला आहे. काँग्रेसच्या कार्यकाळात विकासाच्या फक्त गप्पा झाल्या, पण प्रत्यक्षात काहीच केले नाही. शिर्डी विधानसभा मतदारसंघात या भागातील गावांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आम्ही विशेष प्रयत्न केले आहेत.

***निळवंडे कालव्या प्रकल्पाचे श्रेय महायुतीचेच***

निळवंडे कालव्याचा प्रकल्प काँग्रेसच्या कार्यकाळात रखडला होता. मात्र, महायुती सरकारच्या पुढाकाराने कालव्यांची कामे मार्गी लागली. कालव्यांचे पाणी आणण्याचे श्रेय हे फक्त महायुती सरकारचेच आहे, असे ठामपणे सांगत विखे पाटील यांनी काँग्रेसच्या निष्क्रियतेवर जोरदार प्रहार केला.

***औद्योगिक विकासाचे महत्त्वपूर्ण निर्णय***

जिल्ह्यातील तीन तालुक्यांना औद्योगिक वसाहतींसाठी जागा उपलब्ध करून दिल्याचे विखे पाटील यांनी सांगितले. महसूल मंत्रीपद असतानाही थोरातांना हे साध्य करता आले नाही, असे सांगत त्यांनी रोजगार निर्मितीतील काँग्रेसच्या अपयशावर लक्ष वेधले.

***आ. थोरातांच्या निष्क्रियतेची टीका***

विखे पाटील यांनी आ. थोरात यांना निष्क्रियतेवरून टोला लगावत म्हटले की, डॉ. सुजय विखे पाटील यांच्या सभेला मिळालेल्या प्रतिसादामुळे थोरात हादरले आहेत. तालुक्यातील युवकांसह ज्येष्ठ नागरिक व महिलाही काँग्रेसच्या ४० वर्षांच्या कामगिरीवर तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करत आहेत.

## संविधान बदलण्याच्या भूलथापांना बळी पडू नका – नितीन गडकरी

**पुलगाव । प्रतिनिधी**

केशवानंद भारती प्रकरणात नऊ सदस्यीय पिठाने भारतीय संविधानाच्या मूलभूत तत्त्वांमध्ये बदल करता येणार नाही, असा निर्णय दिला आहे. त्यामुळे संविधान बदलण्याच्या भूलथापांना बळी पडू नका आणि भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांना विजयी करा, असे आवाहन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी पुलगाव येथे राजेश बकाने यांच्या प्रचार सभेत केले.




स्थानिक सर्कस मैदानात आयोजित सभेत ना. गडकरी पुढे म्हणाले, काँग्रेस जातिवाद आणि संप्रदायाचे विष पेरून समाजात दुही निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. हा कुटिल डाव उधळून टाकणे आवश्यक आहे. जात आणि धर्माच्या आधारावर नाही, तर गुणवत्तेच्या आधारे उमेदवार निवडावा. सामाजिक विषमतेवर आधारित आरक्षण कायम ठेवले पाहिजे.

यावेळी त्यांनी भाजपचे उमेदवार युवक, शेतकरी, महिला यांच्या समस्यांवर काम करणारे असल्याचे सांगून, सामान्य कार्यकर्त्यालाही पक्षात उंचावण्याची संधी मिळते, हे भाजपा पक्षाचे वैशिष्ट्य असल्याचे नमूद केले. काँग्रेस नेत्यांवर टीका करत गडकरी यांनी, स्वतःच्या आणि कुटुंबाच्या फायद्यासाठी काम करणाऱ्या काँग्रेस नेत्यांपासून सावध राहा, असे आवाहन केले.

सभेला राजेश बकाने, भाजपा ओबीसी मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष संजय गाते, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष वैशाली येरावार, रिपब्लिकन पक्षाचे विजय आगलावे, राष्ट्रवादी पार्टीचे जिल्हाध्यक्ष शरद सहारे, विधानसभा क्षेत्र प्रमुख तुषार वाघ यांनी संबोधित केले.

सभेचे संचालन जिल्हा महामंत्री राहुल चोपडा यांनी केले, तर आभार प्रदर्शन आकाश दुबे यांनी केले. भाजपा माजी नेते आणि रा. स्व. संघाचे तालुका समरसता प्रमुख विजय निवल हे जनसमुदायात बसले असता, ना. नितीन गडकरी यांनी मंचावरून त्यांना सन्मानपूर्वक मंचावर बोलावले.

सभेला परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.